| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ३१ वा | शनिवार दिनांक ०४ एप्रिल, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम,जिल्ह्याची ऐतिहासिक झेप : १३० टक्के उद्दिष्ट पूर्ण



धाराशिव,दि.३ एप्रिल (जिमाका ) जिल्हा उद्योग केंद्राने सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) या महत्त्वाकांक्षी योजनेत १३० टक्के उद्दिष्ट पूर्ण करत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.हे यश जिल्हाधिकारी यांच्या कुशल मार्गदर्शनामुळे शक्य झाल्याचे जिल्हा उद्योग केंद्राकडून सांगण्यात आले.या योजनेअंतर्गत जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत उद्योजकतेला चालना देण्यात आली.

जिल्हाधिकाऱ्यांनी वेळोवेळी घेतलेल्या आढावा बैठका,नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि प्रशासनातील समन्वय यामुळे संपूर्ण यंत्रणेला नवी दिशा मिळाली. विशेषतः प्रलंबित प्रकरणांच्या जलद मंजुरीसाठी बँक अधिकाऱ्यांसमवेत घेण्यात आलेल्या बैठका आणि दिलेले स्पष्ट निर्देश यामुळे कर्जमंजुरी प्रक्रियेतील अडथळे दूर झाले.परिणामी,अनेक प्रस्तावांना वेळेत मंजुरी मिळून लाभार्थ्यांना उद्योग सुरू करण्यासाठी आवश्यक आर्थिक पाठबळ मिळाले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही योजना केवळ कर्जपुरवठ्यापुरती मर्यादित नसून,ग्रामीण व शहरी भागातील तरुणांना उद्योग उभारणीसाठी प्रोत्साहन देणारी एक प्रभावी संधी आहे. या माध्यमातून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती वाढून आर्थिक विकासाला गती मिळत आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या कृतिशील व संवेदनशील दृष्टिकोनामुळे जिल्ह्यातील शेकडो होतकरू युवक-युवतींच्या उद्योजक होण्याच्या स्वप्नांना बळ मिळाले असून, रोजगार निर्मिती क्षेत्रात जिल्ह्याने नवा आदर्श निर्माण केला आहे.

या यशाबद्दल जिल्हा उद्योग केंद्र व खादी ग्रामोद्योग विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे विशेष आभार व्यक्त केले आहेत.

## अवकाळीचा तिसऱ्यांदा तडाखा, वीज पडून ७ जनावरे ठार: पिकांचे नुकसान



धाराशिव जिल्ह्यात मार्च नंतर एप्रिल महिन्यातही अवकाळीने धुमाकूळ घातला आहे. १ एप्रिल रोजी झालेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात विजांच्या तांडवही सुरु होता. विजा पडून तब्बल ७ जनावरे दगावली आहेत. आंबा, खरबूज, टरबूज फळांसह टोमॅटो व इतर भाजीपाल्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी पुन्हा आर्थिक संकटात सापडला आहे.

बुधवारी रात्री तुळजापूर, लोहारा यासह अनेक भागांतील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. गुरुवारी मध्यरात्री भूम, लोहारा, कळंब, धाराशिव शहर व परिसरात वादळी वारे, मेघगर्जनेसह पाऊस झाला. द्राक्ष आणि आंब्याच्या मोहोराचे मोठे नुकसान होऊन शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला आहे.वादळी वाऱ्यामुळे रब्बी हंगामातील ज्वारी पिक आडवे पडल्याने नुकसान झाले आहे. पावसादरम्यान विजाही अनेक भागात कोसळल्या आहेत. तुळजापूर तालुक्यातील मेसाई जवळगा येथील सुभाष मस्के यांचा एक बैल व दोन म्हशी वीज पडून ठार झाल्या. कळंब तालुक्यातील वाठवडा येथील पशुपालकाची एक गाय दगावली आहे. तर कळंब तालुक्यातीलच गौर येथे एक म्हैस दगावली आहे. वाशी तालुक्यातही एक पशुधन दगावल्याची नोंद जिल्हा प्रशासनाकडे आहे. मागील महिन्यातही वीज पडून तब्बल १५ जनावरे दगावली आहेत. डॉ. नकुल हरवाडीकर, कृषी हवामान शास्त्रज्ञ, कृषी विज्ञान केंद्र, तुळजापूर

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना नुकसानग्रस्त भागात तातडीने पंचनामे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कोकणात ज्या पद्धतीने नुकसानीचे पंचनामे करण्यात आले, त्याच धर्तीवर पारदर्शक आणि अचूक पंचनामे करण्याचे निर्देश पालकमंत्री सरनाईक यांनी दिले आहेत.

१ एप्रिल रोजी अवकाळी पाऊस झाला. शुक्रवारीही जिल्ह्यातील काही भागात १० ते १२ मिलीमीटर पाऊस पडणार आहे. वादळी वारे व वीजांचा धोका राहणार आहे. शनिवारी काही भागात अवकाळी पाऊस होईल. अवकाळीचा आंबा, खरबूज, टरबूज, भाजीपाला व ज्वारी पिकास फटका बसत आहे.

## क्राईम न्युज

### सोन्याची माळ व रक्कम हिसकावली

तुळजापूर (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी शुभम बजरंग लांडे, वय २२ वर्षे, रा. पि. एम. टी. कॉलनी शेजारी गैस गोडाउन जवळ श्री समर्थ नगर लेर नं ८ बिबेवाडी पुणे हे व ऐश्वर्या सोजवळ, सरोजा पांढरे, पायल लांडे, आरती भोसले, व अपंग मिहला श्रध्दा भोंगळे यांना अनोळखी चार इसमांनी दि. ०२.०४.२०२६ रोजी तुळजापूर येथील घाटशिळ पार्कींग जवळील १०८ भक्त निवास येथील हॉल मध्ये नंबर ०४ व हॉल समोर जेवण वाडत असताना नमुद अनोळखी इसमांनी शिवीगाळ करुन लोखंडी पाईप, पाण्याचे जार, स्टीलचे भांड्याने मारहाण करुन सरोजा पांढरे यांचे गळ्यातील सोन्याची ३ ग्रॅमची माळव सोहेब तांबोळी यांचे शर्टाचे खिशातील रोख रक्कम ५,००० जबरीने हिसकावून घेवून गेले. अशा मजकुराच्या फिर्यादी शुभम लांडे यांनी दि.०२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या. स.कलम ३०९(६), ७४ सह अंपग व्यक्ती अधिकार अधिनियम कलम ९२ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### टॅम्पो सह कच्ची सुपारी अज्ञातानी चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- अझहर युनुस शेख, वय ३९ वर्षे, रा. खॉजा नगर आजम चौक गल्ली नं १९ धाराशिव ता. जि. धाराशिव यांनी दि.२९.०३.२०२६ रोजी संगम हॉटेलच्या समोर परुडा रोड धाराशिव येथे आयशर कंपनीचा टॅम्पो क्रमांक एमएच २४ ए.यु.१४०४ सह कच्ची सुपारी १० टन ७५ किलो अशा एकुण १५५ बॅगा वाहनासह एकुण ६६,१२,५९२ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- अझहर शेख यांनी दि.०२.०४.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!**
**झाडे जगवा!!**
**झाडे तोड रोखा !!!**

## महाशिवपुराणाच्या श्रवणामुळे मानवी दोष नाहीसे होऊन जीवन सार्थक होते-वेदांतचार्य हुके महाराजांचे प्रतिपादन

परंडा (प्रतिनिधी)- इच्छा नसताना केलेला परमार्थ वाया जात नाही, असे महाशिवपुराणातील शब्द कानावर पडल्याने आपल्या मधील दोष नाहीसे होऊन जीवनाचे सार्थक होते, असे प्रतिपादन वेदांताचार्य दत्तात्रय हुके महाराज यांनी महाशिवपुराण कथा सादर करताना केले.

परंडा शहरातील लाल मारुती जन्मोत्सव सोहळ्या निमित्त शिवमहापुराण कथा ३१ मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत आयोजित करण्यात आली तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी (दि. ३१) शिवमहापुराण कथेने या सोहळ्याचा प्रारंभ पुण्याचे आमदार सुनिल कांबळे यांच्या हस्ते ग्रंथपूजन करून करण्यात आला. दररोज सायंकाळी ६ ते ९ या वेळेत शहरातील काशीद मळा येथे शिवमहापुराण कथा सोहळा आयोजित केला जातो. लाल मारुतीचा मुख्य रथोत्सव ५ एप्रिल रोजी होणार आहे.

हभप वेदांताचार्य दत्तात्रय महाराज हुके यांनी शिवमहापुराण कथेचे मंगळवारी (दि. ३१) महात्म्य सांगताना सांगितले की, शिवपुराण कथा ऐकत असताना एकाग्रता आवश्यक आहे. आपल्या वाणीमधून कोणाचीही निंदा करू नका, त्याचे पाप आपल्याला लागते. चांगल्या विचारांच्या लोकांची संगत करावी, चांगल्या गुणांचे मुक्त कंठाने स्तुती करणे व संकटाच्या वेळेस त्यांच्याकडून मदत मिळणे हे खरे मित्रत्व दर्शवते. दरम्यान, रविवारी (दि. ५) सायंकाळी ५ वा. परंपरेनुसार लाल मारुती मंदिरापासून



भवानी-शंकर, काळा मारुती मंदिरापर्यंत रथाची मिरवणूक होईल आणि काळा मारुती मंदिरात महाआरती करून लाल मारुती मंदिराकडे परत येऊन रथोत्सवाचा समारोप महाप्रसाद वाटपाने होईल. यावेळी श्रीक्षेत्र चिंचगाव टेकडी प.पु. शिवचरनानंद सरस्वती महाराज, श्रीक्षेत्र तुळजापूर महंत तुकोजी बुवा, श्रीक्षेत्र सोनारीचे महंत योगी शामनाथ बाबा महाराज, संजय महाराज पुजारी, श्रीक्षेत्र सामनगाव येथील हभप धर्मराज महाराज सामनगावकर यांची उपस्थिती राहणार आहे. सती खंडात शिव-पार्वतीचा विवाह बुधवारी (दि. १) शिवलिंग सृष्टी या कथेच्या माध्यमातून शिवलिंगाचे महात्म्य सांगितले गेले. गुरुवारी (दि. २) सती खंडात शिव-पार्वतीचा विवाह संपन्न झाला. शुक्रवारी (दि. ३) गणपती जन्मोत्सव व युद्ध खंडाचे आयोजन झाले तर शनिवारी (दि. ४) बारा ज्योतिर्लिंग कथा, कालाप्रसंग आणि कथेचा समारोप करण्यात येणार आहे. या सोहळ्यात स्थानिक भाविक मोठ्या प्रमाणात उपस्थित राहून धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेत आहेत.

पहिल्या रविवारी रथोत्सव सोहळ्याचे आयोजन लाल मारुती मंदिरात व समसमपुरी मारुती येथील मंदिरात पहाटे हनुमान जन्मोत्सव सोहळा विधिवत पुजा अर्चा करुन आरती करण्यात आली.भाविकांनी जन्मोत्सव सोहळ्यासाठी मोठी गर्दी केली होती. लाल मारुती मंदीराच्या वतीने जन्मोत्सवा नंतर येणाऱ्या पहिल्या रविवारी रथोत्सव सोहळा संपन्न होणार आहे. लाल मारुती जन्मोत्सव सोहळ्या निमित्त दररोज सायंकाळी ६ ते रात्री ९ या कालावधीत वेदांतचार्य दत्तात्रय हुके महाराज यांच्या सुमधूर वाणीतून महाशिपुराण कथा सुरु आहे. शनिवारी बारा ज्योतिर्लिंग कथेचा समारोप बुधवारी (दि. १) शिवलिंग सृष्टी विचार, गुरुवारी (दि. २) सती खंड आणि शिवपार्वती विवाह, शुक्रवारी (दि. ३) गणपती जन्मोत्सव आणि युद्ध खंड तर शनिवारी (दि. ४) बारा ज्योतिर्लिंग कथा, कालाप्रसंग व कथेचा समारोप होणार आहे. कथेनंतर महाप्रसादाचे आयोजन केले जाईल. रविवारी (दि. ५) सायंकाळी ५ वाजता परंपरेनुसार लाल मारुती मंदिरापासून भवानी-शंकर, काळा मारुती मंदिरापर्यंत रथाची मिरवणूक होईल. काळा मारुती मंदिरात महाआरती करून रथ लाल मारुती मंदिराकडे परत येईल आणि महाप्रसाद वाटप करून रथोत्सवाचा समारोप होईल.

## संबळाच्या कडकडाटामध्ये तुळजाभवानी मातेचा छबिना: हजारो भाविकांची उपस्थिती



तुळजापूर (शीला उंबरे-पेंढरकर)- साडेतीन शक्तिपीठापैकी एक असलेल्या आई तुळजाभवानीच्या चैत्र पौर्णिमा यात्रेनिमित्त तुळजाभवानी मंदिर परिसरात भक्तिभावाने नटलेले वातावरण पाहायला मिळाले. सायंकाळी पार पडलेल्या अभिषेक पूजेनंतर रात्री उशिरा संभळाच्या कडकडाटात तुळजाभवानी मातेचा पारंपरिक छबिना मोठ्या उत्साहात काढण्यात आला. या सोहळ्याला राज्यासह परराज्यातून आलेल्या हजारो भाविकांनी उपस्थित राहून आई तुळजाभवानीचा जयघोष केला.

बुधवारी मंदिरातील धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर मातेची चांदीची मूर्ती आकर्षक पद्धतीने सजवलेल्या छबिना वाहनावर विराजमान करण्यात आली. त्यानंतर रात्री १० ते १०.३० या कालावधीत पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि संभळाच्या कडकडाटात छबिना मिरवणुकीला सुरुवात झाली. मंदिराच्या प्रदक्षिणा मार्गावर ही मिरवणूक काढण्यात आली. एक प्रदक्षिणा पूर्ण करण्यात आली. यावेळी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाला . छबिना मार्गावर भाविकांनी मोठी गर्दी केली होती. काही भाविकांनी फुलांची उधळण करत मातेचे स्वागत केले, तर काहींनी भक्तिगीतांच्या माध्यमातून आपली श्रद्धा व्यक्त केली. जय भवानी, जय शिवाजीच्या गजराने वातावरण भारावून गेले होते.

या सोहळ्यात पुजारी, सेवेकरी, मंदिर संस्थानचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सुरक्षेच्या दृष्टीने पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला होता. मिरवणुकीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात आली. दरम्यान, या छबिना मिरवणुकीसाठी महाराष्ट्रासह कर्नाटक, आंध्रप्रदेश आणि तेलंगणा राज्यांमधून हजारो भाविक तुळजापूर येथे दाखल झाले होते. अनेक भाविकांनी नवस फेडण्यासाठी तसेच पौर्णिमेचे दर्शन घेण्यासाठी हजेरी लावली. तुळजाभवानी मातेच्या या पारंपरिक छबिना सोहळ्यामुळे तुळजापूर नगरीत भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाचे अद्भुत संगम अनुभवायला मिळाला. थेट दर्शन रांगेत थंडगार पाणी चैत्र पौर्णिमा यात्रेत भाविकांना दर्शन रांगेत पिण्याचे थंडगार पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. दर्शन मंडपाचा प्रत्येक मजल्यावर औसा येथील स्वयंसेवक भाविकांना सेवा देत आहेत. याशिवाय मंदिर परिसरात सावलीसह पिण्याचा पाण्याची सोय करण्यात आल्याने भाविकांतून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

अ भातांगळीची मानाची काठी येणार मंदिरात चैत्र पौर्णिमेनिमित्त ज शिखर शिगणापूरवरून भातागळीची मानाची काठी तुळजाभवानी मंदिरात दाखल होणार आहे. विधीवत पूजनानंतर पारंपरिक छबिना मिरवणूक काढण्यात येणार असून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहण्याची शक्यता आहे. मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण होणार आहे. चैत्र पौर्णिमेनिमित्त सलग तीन दिवस छबिना मिरवणुकीची परंपरा आहे.दर्शन घेतल्यानंतर अनेक भाविक येरमाळ्यातील येडेश्वरी देवीच्या दर्शनासाठी रवाना होतात. या पार्श्वभूमीवर तुळजापूर येथे भाविकांची मोठी गर्दी होण्याची शक्यता असून प्रशासन सतर्क झाले आहे.

## जळकोट येथील समर्थ क्लासेस मध्ये मार्गदर्शन शिबिराचे आयोजन



तुळजापूर (विजय पिसे)- तालुक्यातील जळकोट येथील समर्थ क्लासेस तर्फे १० वी नंतर पुढे काय? या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन श्री केदारलिंग मंदिर सभागृहात करण्यात आले होते. यावेळी प्रथमता कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे व मान्यवरांचे पुष्पगुच्छ व श्री स्वामी समर्थांची प्रतिमा देऊन स्वागत करण्यात आले.

यावेळी सोलापूर येथील मोशन अकॅडमीच्या टीम मधील आनंद पुजारी सर, पूजा गौतम मॅडम व स्मिता साबळे मॅडम यांनी विद्यार्थ्यांना दहावी नंतर पुढे काय केले पाहिजे याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना समजून सांगितले.

या शिबिराला विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना १० वी नंतर उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक शाखांची सविस्तर माहिती देण्यात आली. विज्ञान, वाणिज्य व कला शाखांसोबतच आयटीआय, डिप्लोमा, पॉलिटेक्निक तसेच विविध स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. योग्य करिअर निवड कशी करावी, याबाबतही विद्यार्थ्यांना उपयुक्त सूचना देण्यात आल्या.

यावेळी समर्थ क्लासेसचे संचालक रामशेट्टी पाटील सर यांनी विद्यार्थ्यांना आपल्या आवडी व क्षमतेनुसार योग्य क्षेत्र निवडण्याचे महत्त्व पटवून दिले. तसेच सातत्यपूर्ण अभ्यास आणि योग्य नियोजन केल्यास यश निश्चित मिळते, असे त्यांनी सांगितले. यावेळी या कार्यक्रमाचे अध्यक्ष सतीश माळी यांनी विद्यार्थ्यांसाठी आकाशी झेप घे रे पाखरा या गीताचे आपल्या मधुर आवाजात गायन केले. या कार्यक्रमास पत्रकार विजय पिसे, महिला पालक वर्ग व पुरुष पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समज क्लासेसची विद्यार्थिनी वैभवी पिसे, अनुष्का स्वामी यांनी केले. तर आभार प्रदर्शन समर्थ क्लासेस संचालक रामशेट्टी सर यांनी केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## काँग्रेसने रणनिती बदलण्याची गरज

देशात पाच राज्याच्या विधानसभेची निवडणुक होत आहे. यात भाजपाने आपली सत्ता यावी यासाठी मोठा प्रयत्न सुरू केलेला आहे. प.बंगालमध्ये भाजपाने जोर मारला असून केंद्रिय गृहमंत्री अमित शहा या राज्यात तळ ठोकून आहेत. आसाम मध्ये भाजपाला सत्ता मिळविता येईल मात्र प.बंगाल, केरळ व तामिळनाडूत कठिण मार्ग आहे तरी या ठिकाणी मित्र पक्षाच्या जोरावर सत्ताधाऱ्यांना हटविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. तामिळनाडून प्रसिद्ध चित्रपट अभिनेत्याच्या जोरावर सत्ता हस्तगत करावी लागणार आहे. दक्षिणेत भाजपाला स्वबळावर सत्ता मिळविणे आवघड आहे हे भाजपाला माहिती आहे तरी भाजपा केरळ सह प.बंगाल घेण्याचा जोरदार प्रयत्न करतील. या पाच राज्यात काँग्रेसची सत्ता येईल किंवा त्यांचे उमेदवार विजयी होतील असे नाही. काँग्रेस किती उमेदवार उभे करतील त्यापेक्षा मित्र पक्षाला पाठींबा देतील. राहुल गांधी हे प्रचारात गुंतले आहे. काँग्रेसचे राहुल गांधी यांनी एकमेव कार्यक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बाबत अपशब्द बोलणे हाच हाती घेतल्याचे दिसून येत आहे. राहुल गांधी विकासाबाबत कमी बोलतात व इतरावर अधिक टिका करतात. विविध राज्यातील विविध प्रश्न आहेत. काही राज्यात ठराविक समस्या आहेत व ठराविकांना मानणारा वर्ग आहे. केरळ मध्ये शिकलेले प्रमाण अधिक आहे. भाजपाला मानणारे कमी आहेत. डाव्यांची संख्या अधिक आहे. अशा स्थितीत भाजपाला या पाच विधानसभेत म्हणावे तेवढे यश मिळेल असे वाटत नाही तरी भाजपाचे प्रयत्न अधिक राहातील. यापेक्षा सर्वात वाईट स्थिती ही काँग्रेसची आहे. या पाच राज्यात काँग्रेसची सत्ता नाही. मित्र पक्षाबरोबरचे संबंध तेवढे चांगले नाहीत. प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी ह्या काँग्रेसला म्हणावे तेवढे महत्त्व देत नाहीत. त्यामुळे काँग्रेसने या पाच विधानसभेत यश मिळेल, याची अपेक्षा न केलेली बरी. राहीला प्रश्न देश पातळीवर वरचेवर एक-एक राज्य काँग्रेसने गमावले आहेत. आपल्याच पायावर दगड मारून घेतल्याचा परिणाम दिसून येत आहे. काँग्रेसने दिर्घ विचार केला पाहिजे. जेंव्हा पासून राहुल गांधी यांनी पक्षाचे सुत्र घेतल्यापासून म्हणावे तसे यश मिळत नाही. प्रियंका यांचे भाषण तसे अभ्यासू नसते. भाषेचा समस्या आहे. लोकांना आकर्षित करण्याचा प्रयत्न सफल होत नाही. काँग्रेसला यावेळी लोकसभेत विरोधीपक्षनेते पद मिळविता आले. यावेळी राहुल गांधी विरोधीपक्ष नेते असले तरी विरोधकाकडून जी मजबुत अंकुश सत्ताधाऱ्यावर हवा असतो तो नाही. त्यांच्यापेक्षा लोकसभेत खरगे प्रभावी ठरतात. अनेक महिलांचे भाषण मुद्देसुद असते. अनेकांची सरस भाषाशैली दिसून येते. वास्तविक विरोधीपक्षनेते म्हणून काँग्रेसची शक्ती दिसून येत नाही. त्यामुळे आगामी पाच राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत भाजपाला काही प्रमाणात यश मिळेल मात्र काँग्रेस बाबत प्रश्न चिन्हच आहे. काँग्रेसने जनतेसोबत असले पाहिजे. महाराष्ट्रात सुद्धा समाधानकारक परिस्थिती नाही. एकेकाळ केवळ काँग्रेसचा बोलबाला होता. काँग्रेसशिवाय कोणालाही सत्ता स्थापन करण्यात येत नव्हती. आज खालून पहिला नंबर काँग्रेसचा असेल तर मोठे दुर्दैव आहे. या बाबत कोणी विचार करीत नाही. पक्षाचे प्रमुख नेते मंडळी प्रामाणिक प्रयत्न करीत नाहीत. राज्यात नुकत्याच नगरपरिषद, महानगरपालिका व जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत अतिषय अल्प यश मिळविता आले. या बाबत चिंतन होणे अपेक्षित होते. जेथे अतिषय खराब स्थिती होती तेथे कार्यकर्ते बदलाची गरज असताना कोणीही फिरकले नाही. महाराष्ट्र काँग्रेसचा बालेकिल्ला असताना पुर्ण ढासाळला आहे. यामागील कारणांचा विचार केला पाहिजे. राज्यात काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण सारखे नेते मंडळी गप्प आहेत. काँग्रेसचे जवळपास नेते मंडळी केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना टार्गेट करतात. अपशब्द वापरतांना दिसून येतात. प्रत्यक्षात जनतेची कामे करण्यापासून दूर आहेत. जनतेच्या समस्या जाणून घेत नाहीत. त्या सोडविण्याचा प्रयत्न करीत नाहीत. हे मोठे दुर्दैव आहे. महाराष्ट्रात आवस्था वाईट आहे तसेच इतर राज्यात आहे. त्यामुळे काँग्रेसचे नेते राहुल गांधी पहिल्यांदा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या देण्याचे थांबविले पाहिजे. जे जनतेला आवडत नाही तेच काँग्रेस पक्षाकडून होत आहे. महाराष्ट्रात किती नगरपरिषदा, महानगरपालिका किंवा जिल्हा परिषदा ताब्यात आल्या याचा विचार केला पाहिजे. सतत शिव्या देणे हे अनेकांना आवडत नाही. जी स्थिती राज्यात आहे तीच सर्वत्र काँग्रेसची स्थिती देशात आहे. काँग्रेस पक्षाने आपली स्थिती सुधारण्यासाठी काही प्रामाणिक प्रयत्नाची गरज आहे. भाजपाला माहिती असेल की, केरळ किंवा प.बंगाल मध्ये डाळ शिजणार नाही. तरी प्रयत्न मोठ्या प्रमाणात केले जात आहेत. येथे अनेक दिवसापासून ममता बॅनर्जी यांची सत्ता असल्याने जनता कंठाळली आहे. ममताचे भाषण सुद्धा भावना भडकावणारे आहे. भाजपाचे राज्य आल्यास मांस खाऊ देणार नाही. देशातील अनेक भागात गाईला माता मानतात. गाय ही बहुउपयोगी मानवासाठी आहे. ती खाण्यासाठी नाही तरी केरळ मध्ये काँग्रेसचे मंडळी भर चौकात गायीच्या बछड्याला कापून रस्त्यावर शिजवत असल्याचे वृत्त चित्रासह पुर्वी पाहिले आहे. एखद्या समाजाच्या भावना दुखविण्याचा प्रयत्न काही कामाचा नाही. काँग्रेसचे देशाच्या स्वातंत्र लढ्यात मोठे योगदान आहे. अशा पक्षाची ख्याती असताना आज काय परिस्थिती नेते व ठराविक कार्यकर्त्यांनी केली आहे. अतिषयवाईट आहे कारण राहुल गांधीसह काँग्रेसची मंडळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना शिव्या घालतात. मोदीजी देशाचे पंतप्रधान आहेत. लोकशाही मार्गाने जनतेनी निवडले गेले आहेत. देशाची सुत्रे सांभाळत असताना त्यांच्या बाबत अपशब्द बोलणे टाळले पाहीजे. या बाबीचा परिणाम पाच विधानसभेच्या निवडणुकीत होणार आहे. अतिषय वाईट आवस्था यापुढे काँग्रेसची होवू नये वाटत असेल व पाच राज्यातील विधानसभेच्या निवडणुकीत लाजीरवाणा पराभव टाळण्यासाठी पंतप्रधाना शिव्या घालणे बंद करावे. मोठ्या प्रमाणात जनतेसोबत जाणे योग्य ठरणारे आहे.

# सत्ताधाऱ्यांची निष्क्रीयता आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकर पाण्यापासून वंचित

## नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडी जिल्हाध्यक्षा शितल मालू यांचा आरोप

**लातूर/प्रतिनिधी :** काही महिन्यापूर्वीच लातूर महानगरपालिकेच्या निवडणूक प्रचारादरम्यान लातूर शहराचे आमदार अमित देशमुख यांनी लातूरकरांना २४ तास व सात दिवस शुध्द पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला भुलून लातूरकरांनी मनपाची सत्ता काँग्रेसच्या हाती दिली. मात्र सत्ता हाती येताच लातूरकरांना वायावर सोडण्याचे काम आ. अमित देशमुख यांनी केले आहे. सत्ताधायांच्या निष्क्रियतेमुळे आणि प्रशासनाच्या बेजबाबदारपणामुळे लातूरकरांना गेल्या चार दिवसांपासून पाणी टंचाईला सामोरे जावे लागल्याचा आरोप नगरसेविका तथा भाजपा महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा शितल मालू यांनी केला आहे. लवकरात लवकर पाणी पुरवठा सुरळीत होवून शुध्द पाणी लातूरकरांना न मिळाल्यास आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शितल मालू यांनी दिला आहे.



लातूरकरांनी लातूर मनपा प्रशासनाच्या आवाहनाला प्रतिसाद देत करोडो रुपयांचा कर भरला असल्याचे सांगण्यात येत आहे. विशेष म्हणजे यावर्षीतर विक्रमी कर वसूली झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगितले आहे. या कररुपी आलेल्या पैशातून लातूरकरांना नागरी सुविधा उपलब्ध करून देणे प्रशासनाचे कर्तव्य असल्याचे आठवण करून देत शितल मालू यांनी या पैशाच्या माध्यमातून पाणी पुरवठ्याचे वीजबिल का अदा करण्यात आले नाही, असा संतप्त सवाल उपस्थित केला आहे. प्रशासनाचे उदासिन धोरण आणि त्याला मिळणारी सत्ताधायांची निष्क्रियतेची साथ यामुळे लातूरकरांना धरणात पाणी असूनही पाण्यापासून वंचित रहावे,लागत आहे. मनपा निवडणुक प्रचारादरम्यान मोठ मोठी आश्वासने देणारे शहराचे आमदार तथा काँग्रेस नेते अमित देशमुख यांनाही लातूरकरांशी काहीच देणे घेणे नसल्याचे या माध्यमातून पुन्हा एकदा समोर आले आहे. आ. देशमुख यांनी या प्रकरणी लक्ष घालून महापौर व त्यांच्या टीमला सूचना दिल्या असत्या तर लातूरच्या पाणीपुरवठ्याची वीज खंडीत झाली नसती असा आरोपही शितल मालू यांनी केलेला आहे.

पाण्याच्या राजकारण करून निवडणुका नेहमीच लढविणाया काँग्रेसच्या मंडळींना इशारा देत शितल मालू यांनी लवकरात लवकर लातूर शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होवून नागरिकांना शुध्द पाणी मिळाले नाही तर तिव्र आंदोलन करण्यात येईल, असेही स्पष्ट केले आहे.

# भावनात्मक बुद्धिमत्तेवर प्रभुत्व मिळवणे

भावनिक बुद्धिमत्ता ही व्यक्तीच्या जीवनातील एक महत्त्वाची कौशल्यसंपदा आहे जी आपल्याला स्वतःच्या आणि इतरांच्या भावना ओळखण्यास, समजून घेण्यास आणि योग्य प्रकारे व्यवस्थापित करण्यास मदत करते. ही केवळ जन्मजात नसून शिकता आणि विकसित करता येणारी क्षमता आहे. वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यात यश मिळवण्यासाठी भावनिक बुद्धिमत्तेची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

भावनिक बुद्धिमत्तेचे चार मुख्य घटक आहेत: स्व-ज्ञान (Self-Awareness), स्व-नियमन (Self-Regulation), सामाजिक जागरूकता (Social Awareness) आणि सामाजिक कौशल्ये (Social Skills). स्व-ज्ञान म्हणजे स्वतःच्या भावना, विचार आणि वर्तन यांची जाणीव असणे. यामुळे व्यक्ती अधिक आत्मविश्वासू, निर्णयक्षम आणि प्रभावी संवादक बनते. स्व-नियमनामुळे व्यक्ती तणावाच्या परिस्थितीत शांत राहू शकते आणि आवेगांवर नियंत्रण ठेवू शकते.

सामाजिक जागरूकता म्हणजे इतरांच्या भावनांची समज आणि सहानुभूती दाखवण्याची क्षमता. यामुळे नातेसंबंध अधिक मजबूत होतात आणि संवाद सुलभ होतो. सामाजिक कौशल्ये व्यक्तीला संघकार्य, नेतृत्व, संघर्ष निवारण आणि इतरांवर प्रभाव टाकण्यास मदत करतात. भावनिक बुद्धिमत्ता विकसित करण्यासाठी काही उपाय महत्त्वाचे आहेत. भावनिक सजगता म्हणजे वर्तमान क्षणात राहून आपल्या भावनांचे निरीक्षण करणे. ध्यान, श्वसन तंत्र आणि आत्मपरीक्षण यामुळे भावनांवर नियंत्रण ठेवता येते. भूतकाळातील अनुभवांमधून शिकणे देखील आवश्यक आहे, कारण प्रत्येक अनुभव व्यक्तीला अधिक परिपक्व बनवतो. तसेच, इतरांकडून प्रामाणिक अभिप्राय घेणे, सतत वाचन व शिक्षण करणे आणि नियमित सराव करणे हे भावनिक बुद्धिमत्ता वाढवण्यासाठी उपयुक्त ठरते. स्व-प्रेरणा व्यक्तीला अडचणींवर मात करून उद्दिष्ट साध्य करण्यास मदत करते. सहानुभूती आणि चांगली सामाजिक कौशल्ये व्यक्तीला प्रभावी संबंध निर्माण करण्यास मदत करतात. निष्कर्षतः, भावनिक बुद्धिमत्ता ही व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. ती मानसिक आरोग्य, सकारात्मक नातेसंबंध, प्रभावी नेतृत्व आणि यशस्वी करिअर यासाठी आधारभूत ठरते. शिक्षण, कार्यस्थळ आणि समाजामध्ये भावनिक बुद्धिमत्तेचा समावेश केल्यास व्यक्ती आणि समाज दोन्ही अधिक संतुलित आणि यशस्वी बनू शकतात.

**लेखिका: अश्विनी अविनाश कुलकर्णी**
**(एल.एल.एम.प्रथम वर्ष)**
**मार्गदर्शक: सहाय्यक प्राध्यापक**
**ओमप्रकाश जाधव सर,**
**दयानंद विधी महाविद्यालय, लातूर**

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव:

## आरोग्य समृद्ध महाराष्ट्राची लोकचळवळ

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे सहभागी झाले होते. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.




'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

दोन ते पाच कोटींचे पुरस्कार

राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत.

राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

**संकलन**
**-जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# वन व्यवस्थापनाची वाटचाल डिजिटल दिशेने

महाराष्ट्र वन विभागाने गेल्या १५० दिवसांत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता, तक्रार निवारण, डेटा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व बाबींमध्ये विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाला गती दिली आहे. या कालावधीत विभागाने केवळ सेवा वितरण सुधारले नाही, तर पर्यावरण संवर्धन आणि वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एक आदर्श निर्माण केला आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवसाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत मंत्रालयीन विभागात राज्यात दुसरे स्थान पटकावले. विभागाला २०० पैकी १७१.५ गुण मिळाले असून डिजिटल कारभारात तो अग्रगण्य विभागांपैकी एक ठरला आहे. या यशाबद्दल वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

वन विभागाचे संकेतस्थळ हे आधुनिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनविण्यात आले आहे. संकेतस्थळाचा लोडिंग वेळ पाच सेकंदांपेक्षा कमी ठेवण्यात यश आले असून, मोबाइल, टॅबलेट आणि संगणक या सर्व माध्यमांवर ते सुलभपणे कार्यरत आहे. विविध ब्राउझरवरही ते सुरळीत चालते, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येतो. संकेतस्थळावर दरमहा सुमारे १.८६ लाख वापरकर्ते भेट देत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते, ज्यातून त्याची उपयुक्तता अधोरेखित होते.सुलभता आणि सर्वसमावेशकता यावर विशेष भर देण्यात आला आहे. संकेतस्थळावर स्क्रीन रीडर, टेक्स्ट रिसाइज, कीबोर्ड नेव्हिगेशन यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दिव्यांग नागरिकांसाठीही संकेतस्थळ सहज वापरता येईल, याची काळजी घेण्यात आली आहे. यासोबतच सायबर सुरक्षा आणि प्रमाणपत्रांच्या दृष्टीनेही संकेतस्थळाने उच्च मानके पूर्ण केली आहेत. सर्ट-इन मान्यताप्राप्त सायबर सुरक्षा तपासणी आणि जीआयजीडब्ल्यू मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढला आहे.

वन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी संकेतस्थळावर 'सिटिझन चार्टर', आरटीआय विभाग, 'व्हॉट्स न्यू' सेक्शन आणि विविध शासकीय निर्णयांची माहिती नियमितपणे अद्ययावत करण्यात येते. नागरिकांना आवश्यक माहिती सहज मिळावी यासाठी सर्च सुविधा, व्हॉइस-टू-टेक्स्ट शोध आणि साइटमॅप यासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना माहिती शोधणे अधिक सोपे झाले आहे.

सेवा वितरणाच्या बाबतीत वन विभागाने मोठी झेप घेतली आहे. विभागाकडून एकूण ३२ सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, त्यापैकी १३ सेवा लोकसेवा हक्क अधिनियमनाअंतर्गत अधिसूचित असून त्या सर्व ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहेत. 'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण केल्यामुळे नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे, त्याची स्थिती तपासणे आणि सेवा मिळवणे शक्य झाले आहे. या सेवांमध्ये तेंदू व्यापारी नोंदणी, वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई, सॉ मिल परवाना नूतनीकरण, संरक्षित क्षेत्रात छायाचित्रण परवानगी यासारख्या महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे.

या कालावधीत वन विभागाकडून सुमारे १.६३ लाख अर्जांची यशस्वी पूर्तता करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांकडून पहिल्या किंवा दुसऱ्या स्तरावरील अपिलांची संख्या शून्य असल्याचे दिसून येते, यावरून सेवा वितरणातील कार्यक्षमता स्पष्ट होते. याशिवाय, ८९७ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सर्व कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्रणाली आत्मसात केल्याचे दिसून येते.

तक्रार निवारण व्यवस्थेतही वन विभागाने प्रभावी कामगिरी केली आहे. जवळपास ९९८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, त्यापैकी अनेक तक्रारींचे वेळेत निवारण करण्यात आले आहे. एस्कलेशनची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना तक्रारींचा पाठपुरावा करणे सोपे झाले आहे. तक्रार निवारणानंतर नागरिकांकडून मिळालेला सरासरी अभिप्राय ८.७१ इतका असून, यावरून नागरिकांचे समाधान दिसून येते.

वन विभागाने डेटा ॲनालिटिक्सचा प्रभावी वापर करून निर्णय प्रक्रियेला गती दिली आहे. रेट्रोस्पेक्टिव्ह, इन्फरेंशियल आणि प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सचा वापर करून तक्रारींचे विषण करण्यात येते आणि त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेतले जातात. यामुळे समस्यांचे मूळ कारण ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करता येतात.

ई ऑफिस प्रणालीमुळे विभागाच्या अंतर्गत कामकाजात मोठी सुधारणा झाली आहे. ई ऑफिसद्वारे १४,५५३ फाईल्स तयार करण्यात आल्या असून, त्यापैकी ४,०६३ फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या चारवरून तीनपर्यंत कमी करण्यात आली आहे, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. डिजिटल पद्धतीने फाईल व्यवस्थापन केल्यामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. डॅशबोर्ड प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. विविध योजनांची प्रगती, वृक्षलागवड, बांबू मिशन आणि राज्यस्तरीय प्रकल्पांचे निरीक्षण एका ठिकाणी करता येते. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख सुलभ झाली आहे.

नागरिकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉट्सअॅप चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये कार्यरत असलेला हा चॅटबॉट केवळ तीन टप्प्यांत नागरिकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देतो. विविध योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी या माध्यमाचा उपयोग करण्यात आला आहे.

वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बिबट्या ट्रॅकिंग, ताडोबा येथे व्हर्च्युअल वॉल, आग शोध प्रणाली आणि मार्व्हल यासारख्या उपक्रमांमुळे वन्यजीव संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम झाले आहे. जीआयएस प्रणालीच्या वापरामुळे वनक्षेत्राचे अचूक मॅपिंग आणि नियोजन करता येत आहे.

महाराष्ट्र वन विभागाने १५० दिवसात केलेल्या कामगिरीतून प्रशासनातील डिजिटल परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येते, याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. या उपक्रमांमुळे सेवा वितरण अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख झाले असून, पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळाली आहे. भविष्यातही तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा विभागाचा निर्धार दिसून येतो. ''वन विभागाने ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमाअंतर्गत राबविलेल्या डिजिटल उपक्रमांमुळे प्रशासनात केवळ तांत्रिक बदल झाले नाहीत, तर कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा घडून आली आहे. यामुळे नागरिकांना सेवा मिळण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि वेगवान झाली आहे. वन्यजीव संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली, जीआयएस तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून आम्ही निर्णय प्रक्रियेला अधिक शास्त्रीय आधार दिला आहे. या सर्व उपक्रमांचा थेट लाभ नागरिकांना मिळत असून, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाची दिशा अधिक मजबूत होत आहे.'' – वनमंत्री गणेश नाईक

''ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांमध्ये आम्ही 'डिजिटल फर्स्ट' या दृष्टीकोनातून काम करत सेवा वितरण, तक्रार निवारण आणि अंतर्गत प्रशासन या तिन्ही स्तरांवर सुधारणा केल्या आहेत. नागरिकांच्या अभिप्रायाचा आणि तक्रारींच्या डेटाचा अभ्यास करून धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. यामुळे केवळ कार्यक्षमता वाढली नाही, तर सेवा अधिक अचूक, पारदर्शक आणि परिणामकारक बनल्या आहेत. आगामी काळातही तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक वापर करून वन व्यवस्थापन आणि नागरिक सेवा अधिक सक्षम करण्यावर आमचा भर राहील.'

**– मिलिंद म्हैसकर, अपर मुख्य सचिव,**
**वन विभाग, महाराष्ट्र शासन**

एका मिठाईच्या दुकानापासून ते राज्यसभेचे उपनेते पदापर्यंतचा प्रवास अशोक मित्तल एका सामान्य पार्श्वभूमीतून पुढे आले आणि शिक्षण क्षेत्रात एक प्रमुख व्यक्तिमत्व बनले, आणि आता राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. एका छोट्या मिठाईच्या व्यवसायापासून सुरुवात करून त्यांनी एलपीयू सारखे एक मोठे विद्यापीठ उभे केले. आता, त्यांना राज्यसभेत एक महत्त्वपूर्ण जबाबदारी देण्यात आली आहे, ज्यामुळे सर्वत्र लक्ष वेधले गेले आहे. पक्षाने राघव चड्ढा यांच्या जागी त्यांची राज्यसभेचे उपनेते म्हणून नियुक्ती केली आहे. या निमित्ताने मित्तल यांची माहिती घेऊ :राजकारणात, मोठी नावे आणि प्रस्थापित चेहरे अनेकदा चर्चेत असतात, पण कधीकधी अशी एक व्यक्ती समोर येते, जिचा प्रवास खरोखरच प्रेरणादायी असते. अशोक मित्तल हे असेच एक व्यक्तिमत्व आहेत. सामान्य पार्श्वभूमीतून येऊन, शिक्षण क्षेत्रात नावलौकिक मिळवून, आणि नंतर महत्त्वपूर्ण राजकीय जबाबदाऱ्या स्वीकारणे हे सोपे काम नसते. जेव्हा आम आदमी पार्टीने (आप) त्यांना राज्यसभेत एका महत्त्वाच्या पदावर नियुक्त केले, तेव्हा तो केवळ एक राजकीय निर्णय नव्हता, तर शिक्षण आणि अनुभवाला प्राधान्य देणाऱ्या मानसिकतेचे ते एक प्रतिबिंब होते. त्यांचा प्रवास हे दाखवून देतो की, यश केवळ राजकारणातच नव्हे, तर समाजाच्या प्रत्येक क्षेत्रात कामातूनही मिळवता येते. विशेष म्हणजे, अशोक मित्तल यांनी एखाद्या मोठ्या उद्योगातून किंवा वारशातून नव्हे, तर एका लहान मिठाईच्या व्यवसायातून सुरुवात केली. आज, हीच व्यक्ती राघव चड्ढ ांसारख्या एका प्रमुख नेत्याची जागा घेत आहे. हा बदल दर्शवतो की, व्यावसायिक आणि शिक्षण क्षेत्राशी संबंधित व्यक्ती राजकारणात वेगाने आपले स्थान निर्माण करत

# अशोक मित्तल कोण आहेत?

आहेत. अशोक मित्तल यांचे नाव यासाठीही विशेष आहे, कारण त्यांनी कित्येक तरुणांचे भविष्य घडवले आहे. ते



मिठाईच्या दुकानापासून विद्यापीठापर्यंत

अशोक मित्तल यांचा जन्म पंजाबमधील जालंधर येथे झाला. त्यांच्या वडिलांनी 'लवली स्वीट्स' नावाचा एक लहान मिठाईचा व्यवसाय सुरू केला. अशोक मित्तल या व्यवसायात आपल्या भावांना मदत करत असत. पण त्यांचे स्वप्न काहीतरी मोठे साध्य करण्याचे होते. हळूहळू त्यांनी शिक्षण क्षेत्रात प्रवेश केला आणि २००५ मध्ये 'लवली प्रोफेशनल युनिव्हर्सिटी'ची स्थापना केली, जी आज देशातील सर्वात मोठ्या खासगी विद्यापीठांपैकी एक मानली जाते.
त्यांनी गुरु नानक देव विद्यापीठात कायद्याचे शिक्षण घेतले. त्यानंतर, शिक्षण क्षेत्रात काम करत असताना, त्यांनी एक संस्था स्थापन केली जिथे हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून समाजाला काहीतरी परत देण्याची त्यांची दूरदृष्टी होती. यामुळेच एलपीयूला केवळ राष्ट्रीयच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही ओळख मिळाली आहे.
अशोक मित्तल यांचा प्रवास केवळ व्यवसाय किंवा शिक्षणापुरता मर्यादित नव्हता. आपल्या कार्याद्वारे त्यांनी लाखो तरुणांना रोजगार आणि चांगल्या संधी मिळवून देण्यास मदत केली. त्यांचे विद्यापीठ विविध क्षेत्रांमध्ये अभ्यासक्रम उपलब्ध करून देते आणि त्याचे पदवीधर भारत आणि परदेशात कार्यरत आहेत. अशा प्रकारे त्यांनी शिक्षण आणि रोजगार यांना जोडण्याचे काम केले.
राजकारणात प्रवेश केल्यानंतरही त्यांचे लक्ष शिक्षण, रोजगार आणि विकासावरच केंद्रित राहिले. 'आप'मध्ये सामील होऊन त्यांनी पंजाबमध्ये सक्रिय भूमिका बजावली. २०२२ मध्ये ते राज्यसभेत पोहोचले आणि संसदेत बऱ्याच महत्त्वाच्या विषयांवर बोलले. एक शांत, व्यावहारिक आणि विकासाभिमुख नेता म्हणून त्यांची ख्याती आहे.

**–समृद्धी धायगुडे**

# मधुमेहींनी नारळाचे पाणी केव्हा प्यावे?

मधुमेहींसाठी नारळाचे पाणी एक आरोग्यदायी पर्याय असू शकते, परंतु त्यात नैसर्गिक साखर (फ्रुक्टोज) असल्यामुळे त्याचे सेवन केव्हा आणि कसे करावे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. तज्ज्ञांच्या मते, मधुमेहींनी नारळाचे पाणी पिण्याची सर्वोत्तम वेळ आणि पद्धत खाली दिली आहे:
१सर्वोत्तम वेळ
२. महत्त्वाच्या खबरदारी
३. कोणत्या परिस्थिती टाळल्या पाहिजेत?
४. प्रो टीप
१पिण्याची सर्वोत्तम वेळ
सकाळी रिकाम्या पोटी हे पिणे सर्वात फायदेशीर मानले जाते. यामुळे चयापचय क्रिया नियमित होण्यास मदत होते आणि त्यातील लॉरिक सिड रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासही मदत करते.
व्यायामानंतर: व्यायामानंतर नारळाचे पाणी प्यायल्याने शरीरातील इलेक्ट्रोलाइट्सची





भरपाई होते आणि एनर्जी ड्रिंक्सला हा एक नैसर्गिक पर्याय आहे.
दुपारच्या जेवणापूर्वी: दुपारच्या जेवणाच्या थोड्या वेळापूर्वी हे घेतल्याने पोट भरल्यासारखे वाटते, ज्यामुळे जेवताना अतिरिक्त कॅलरीज घेणे टाळता येते.
–ङ्डज ठए–ऊ फक्त १५ दिवसांत वाईट कोलेस्ट्रॉल कमी करा! आजपासूनच हे ५ प्रभावी घरगुती उपाय करा
२. महत्त्वाच्या खबरदारी
मलई टाळा: मधुमेहींनी फक्त नारळाचे पाणी प्यावे. नारळाच्या मलईमध्ये (गर) संतृप्त चरबी आणि कॅलरीज जास्त प्रमाणात असतात, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी वाढून वजन वाढू शकते.
प्रमाणासंबंधी सूचना: दिवसाला १५०–२०० मिली (सुमारे एक लहान ग्लास) पेक्षा जास्त नारळाचे पाणी पिऊ नका.
ताजे प्या: नेहमी ताज्या नारळाचे पाणी निवडा. बाजारात मिळणारे पॅकबंद नारळाचे पाणी टाळा, कारण त्यात अनेकदा प्रिझर्व्हेटिव्ह आणि अतिरिक्त साखर असते.–ङ्डज ठए–ऊ डायबेटीस रुग्णांनी रात्री पायांना लावा हे तेल; डॉक्टरही सांगतात फायदे
३. कोणत्या परिस्थिती टाळल्या पाहिजेत?
मूत्रपिंडाच्या समस्या: जर तुम्हाला मधुमेह आणि मूत्रपिंडाच्या इतर समस्या असतील, तर नारळाचे पाणी पिणे टाळा. त्यात पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते, जे मूत्रपिंडाच्या रुग्णांसाठी हानिकारक ठरू शकते.
अनियंत्रित साखर: जर तुमच्या रक्तातील साखरेची पातळी खूप जास्त असेल, तर त्याचे सेवन करण्यापूर्वी नक्कीच डॉक्टरांचा सल्ला घ्या.
एक महत्त्वाची टीप: नारळाच्या पाण्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी (सुमारे ५४) असतो, तरीही ते प्यायल्यानंतर तुमच्या शरीरावर त्याचा काय परिणाम होत आहे हे पाहण्यासाठी एकदा तुमच्या रक्तातील साखरेची पातळी तपासा.

# शिवशाहीचा भाग्यमणी – प्रतापगड (जि. सातारा)

घोडियानिशी त्या डोंगरातल्या उंदराला पकडून आणीन ! जिंदा या मुर्दा !' अशा वल्गना करीत निघालेला अफजलखान, तुळजापूरच्या भवानीला अन् पंढरपूरच्या विठ्ठलाला उपद्रव देत, स्वराज्याकडे धावला. शिवबावर मायेची पाखर घालणा–या जिजाऊसाहेबांना तो जणू प्रश्न करीत होता; 'बोल तुला काय हवं ? स्वराज्य की सौभाग्य?' पण १० नोव्हेंबर १६५९ – म्हणजे मार्गशीर्ष शु. ७, शके १५८१ रोजी शिवरायांची फत्ते झाली. प्रतापगड हा शिवशाहीचा भाग्यमणी ठरला.

**प्रतापगडाला कसे जाल?**

प्रतापगडावर जायला पुणे किंवा मुंबई येथून प्रथम महाबळेश्वर येथे जावे लागते. महाबळेश्वर हे महाराष्ट्रातील सुप्रसिध्द हिलस्टेशन आहे. महाबळेश्वर पासून प्रतापगडापर्यंत रडतोंडी घाटातून एस.टी. बस, टॅक्सी, प्रायव्हेट कार्स मिळू शकतात. महाबळेश्वरपासून सुमारे पाऊण तासात प्रतापगडापर्यंत पोचता येते. मुंबईहून पोलादपूर येथून आंबेनळी घाटातूनही प्रतापगडावर पोचता येते. प्रतापगडाच्या पायथ्याशी रहाणे–जेवणाची सोय उपलब्ध आहे. महाबळेश्वरमध्येही रहाण्या–जेवण्याच्या अत्यंत उत्तम सोयी आहेत.



# आई असे का करते...

गेले काही दिवस आईच्या वागण्यात हळूहळू फरक पडत गेला होता आणि अलीकडे तो प्रकर्षाने जाणवायला लागला होता. रोजच्या व्यवहारातल्या लहान लहान गोष्टी विसरायला होतेय. माझे काहीतरी हरवलेय अशा भावनेने ती अस्वस्थ असते; पण जी गोष्ट हरवलीय असे वाटते ती जवळपासच कुठेतरी असते. हातातल्या छोट्या–छोट्या गोष्टी निगुतीने जपून किंवा कुठेतरी लपवून ठेवते. मध्यंतरी अमरचे ड्रायव्हिंग लायसेन्स हरवलेले. घरभर शोधले नवरा–बायकोत एकमेकांवर चिडचिड करून झाली. शेवटी अनेक सव्यापसव्य करून डुप्लिकेट लायसेन्स मिळवले. रात्री एकत्र जेवताना तो बायकोला म्हणाला, मिळाले एकदाचे डुप्लिकेट लायसेन्स. तेव्हा आईने विचारले, डुप्लिकेट लायसेन्स का काढलेस? म्हणजे काय? गेला महिनाभर लायसेन्स शोधतोय. सापडत नाही. म्हणून डुप्लिकेट काढावं लागले.असे कसे हरवेल? मला का नाही विचारलेस? मी माझ्या कपड्यांच्या खणात व्यवस्थित ठेवलेय आणि आईने जेवता–जेवता उठून त्याला लायसेन्स काढून दिले.
आई असे का करते. आईला डिमेंशियाचा त्रास सुरू झालाय का? वर दिलेली लक्षणे साधारण तशीच आहेत. आपल्या घरातील आई, वडील किंवा कोणाही ज्येष्ठ व्यक्तीच्या वागण्यात अशी लक्षणे दिसू लागली तर, सावध व्हायला हवे; पण लगेच आपल्या मनाने निष्कर्ष न काढता आधी फॅमिली डॉक्टरांना भेटून त्यांच्या सल्ल्याने आवश्यक असल्यास जवळच्या रुग्णालयात तपासण्या करून खातरजमा



करणे गरजेचे आहे. तपासण्या कदाचित खर्चिक वाटू शकतील; पण त्यांना पर्याय नाही. या तपासण्यांनंतर रोगनिदान झाले म्हणजे, डॉक्टर पुढील उपचार सुचवतात.
एखाद्या व्यक्तीला अपघात झाल्यास त्याला रुग्णालयात नेण्यापूर्वी–नेताना जुजबी उपचार करतात. त्यांना प्रथमोपचार म्हणतात. मोठ्या दुखण्यातून बरा होऊन रुग्ण घरी आल्यावर देखील त्याचे पथ्यपाणी सांभाळण्याची जबाबदारी घरातील इतर सदस्यांवर असते. डिमेंशियाचे निदान झालेल्या रुग्णासाठी घरात काय करता येईल? एक लक्षात ठेवायला हवे. रुग्णाची स्मरणशक्ती मंदावली असली तरी, त्याच्या भावना पूर्ववत असतात. त्याच्याशी मायेने वागणे–बोलणे उपयुक्त ठरते. त्याची चूक स्पष्ट दिसली तरी, बोलून न दाखवणे, त्याने स्वतः त्या चुकीचा उल्लेख केला तरी, राहू दे, नको मनाला लावून घेऊ, असे म्हणून त्याला धीर द्यायला हवा. त्याच्याशी बोलताना, काळजी करू नकोस, भिऊ नकोस, मी आहे ना, चुकले तर चुकले, आपण निस्तरू सगळे... या प्रकारचे संवाद रुग्णाला आश्वस्त करतात.
अनेकदा रुग्ण तेच–तेच बोलत राहतो किंवा विचारत राहतो. अशावेळी न कंटाळता शांत स्वरात त्याला प्रतिसाद द्यायला हवा. रुग्णाशी हुज्जत टाळावी. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे रुग्णाच्या खाण्यापिण्याच्या वेळा, औषधे घेण्याच्या वेळा आवर्जून पाळणे गरजेचे आहे. भूक लागली आहे, ही गोष्ट कदाचित रुग्णाला समजणार नाही किंवा सांगता येणार नाही. त्याला चार घास खायला लावले तर, दुखणे अधिक वाढण्याला प्रतिबंध होईल.
काही प्रसंगी रुग्णाच्या मदतीसाठी केअरटेकर किंवा काळजीवाहक नेमण्याची गरज पडते. काळजीवाहक हा रुग्णाचा नातेवाईक नसतो. नोकरीचा भाग म्हणून तो सेवा देत असतो. रुग्णामुळे होणारी चिडचिड त्याला सतत लपवावी लागते. तो आपल्यावरचा मोठा भार कमी करीत असतो. वेळप्रसंगी त्याला देखील प्रेमाने तू आमच्या माणसाची छान काळजी घेत आहेस, अशा आशयाचे चार शब्द बोलले तर त्याचा कामाचा हुरूप वाढतो.
परवा परवा पर्यंत सामान्य नागरिकांना डिमेंशियाबाबत फारशी माहिती नव्हती. डिमेंशिया, अल्झायमर, पार्किन्सन्ससारखे विकार आधीही होते; पण आता पन्नाशी–साठीनंतर त्याचे प्रमाण जास्त दिसू लागले. कदाचित पूर्वी जनजागृती नसल्याने अनेकांना हे त्रास झाले असतील; पण माहितीअभावी त्यांच्या रोगनिदानाकडे आणि उपचारांकडे दुर्लक्ष झाले असेल.हल्ली बहुतांश व्यक्तींकडे अँड्रॉइड फोन असतात आणि त्यावर व्हॉट्सएप सारखी ॲप्लिकेशन्स असतातच. फेसबुकवर Dementia Support Group (डिमेंशिया सहाय्य स्वमदत गट) नावाचा समूह कार्यरत आहे. जाणकार डॉक्टर्स त्यावर अद्ययावत माहिती वेळोवेळी देत असतात. हा समूह किंवा यांसारखे इतर समूह देत असलेली माहिती आवर्जून वाचावी. ही माहिती आणि फॅमिली डॉक्टरचा सल्ला घेऊन, आपण प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढू शकू.

**–विजय तरवडे**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



ममुरुमं..फ हा शब्द ऐकल्यावर अनेकांच्या कपाळावर आठ्या येतात. इंटरनेटवर मॲक्नेफ अर्थात मुरमं, तारुण्यपिटिकांच्या समस्येबद्दलची खरीखोटी माहिती दिलेली असते. जुन्याजाणत्यांच्या अनुभवांपासून ते मैत्रीपूर्ण सल्ल्यांपर्यंत, केमिस्टकडे मिळणाऱ्या औषधांपेक्षा परिणामकारक असल्याचा दावा करणाऱ्या घरगुती उपचारांपासून ते नैसर्गिक उपचारांपर्यंत साऱ्यांचा भडिमार होताना दिसतो. त्यामुळे आपल्या ममुरुमांफ्वरील उपचारांना सुरुवात करण्यापूर्वी या समस्येशी जोडलेल्या गैरसमजांपासून स्वत:ला दूर नेणे आवश्यक आहे.

## २ Joke विनोद




गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?
शिष्य : असत्यवादी.
गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?
शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.

## ३ Message संदेश




Babu apni girlfriend se- darling kal ghar par aa jana koi bhi nahi hoga!
Jab ladki ghar par aati hai to sachmuch koi nahi tha.
Ladka- kya me tumhara hath tham lu?
Ladki – No thanks ! ye itna bhari nahi he!!

## ४ Thought सुविचार




जागृतावस्थेतील व्याधींना निद्रा हेच एकमेव औषध.
–सर्वेटिस

**संस्कृत सुभाषित**

**जीवन्तोऽपि मृता: पञ्च व्यासेन परिकीर्तिता: । दरिद्रो, व्याधितो, मूर्ख:, प्रवासी नित्यसेवक: ।।**

अर्थ : दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी आणि वेठबिगार कामगार हे पाचजण जिवंत असून मेल्यासारखे आहेत अशी व्यासोक्ती आहे.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव
६. पोलिसांवरील अधिकारी
९. ही धरून लगडी घालतात
११. छिद्र, जखम
१२. जय पराजय
१४. घोंगड्या विणणारी जमात
१६. मोठा हातोडा
१७. रम्य दृश्य
१९. धमनी
२१. मला
२४. उपहास
२५. शरीर
२७. खरकट्याचा ढीग
२९. श्रीकृष्णाचे एक नाव
३१. वचक, भीती
३२. हिंदीत शरीर
३३. बारीक झिणझिण
३५. वाक्बगार
३७. अभिमन्यूला ठार मारणारा
३९. फायदा
४०. दहा अब्ज ही संख्या
४१. लाज
४३. रसाळ
४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी
४६. जाणे–येणे, वहिवाट
४८. पायताण
४९. सीतेची जुळी मुले
५१. खदक
४३. म––– रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान हैफ
५४. पौराणिक आयुध
५५. ओझी उचलणारा
५७. सत्त्व
५९. जोखीम
६१. वाई–महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट
६२. पोहणे
६४. गवताचे रुंद पान
६५. निवासस्थान
६६. मत देणारा
६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा
६९. भित्रा, पळ काढणारा
७०. कुलीन
७२. जाणकार
७५. पालव
७७. ढीग
७९. रक्तवाहिन्या
८०. जमीनदार
८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

### उभे शब्द

१. संरक्षण
२. बाहेरच्या विरूद्ध
४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश
५. छोटी
६. सैनिक
७. जपणे
८. आवड
९. घट्ट, तणावाची स्थिती
१०. उष्ण
१३. प्रजा
१५. दृष्टीभेट
१६. गर्द, गच्च
१८. वेगाने
२०. शीतपेय
२२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे
२३. खरे तर हे काही जेवण नव्हे!
२६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला!
२८. माज
३०. आवाज, गोंगाट
३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम
३५. विनाश
३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते
३८. मृत्यूचा राजा
४१. संभवनीय
४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन
४४. नूतन
४७. माळी, बागवान
५०. काढलेली खोडी
५२. जाडसर पीठ
५३. सर्व
५४. मारुती, भीम
५५. हिंदुस्थानी
५६. उपस्थित
५८. उत्सवाचे दिवस
६०. च्या बद्दल
६३. तरतूद
६४. साडी
६५. जात्याचा आवाज
६६. मधुमक्षिका
६७. शील, उदारता
६८. गव्हाचे बारीक पीठ
६९. पुन्हा
७१. नवरा
७३. नवरत्नांपैकी एक
७४. खेडे
७६. फितुरी
७७. भूपती
७८. माळ, हार

### आडवे उत्तर

१.आर.आर. पाटील ६.फौजदार ९.तंगडी ११.क्षत १२.हारजीत १४.सनगर १६.घण १७.विलोभनीय १९.नस २१.मज २४.टर २५.तन २७.रमराट २९.दामोदर ३१.धाक ३२.बदन ३३.रवरव ३५.सराईत ३७.जयद्रथ ३९.लाभ ४०.खर्व ४१.शरम ४३.रसवान ४५.नागर ४६.राबता ४८.वहाण ४९.लवकुश ५१.चर ५३.सजन ५४.गदा ५५.भारवाहक ५७.कस ५९.जबाबदारी ६१.पसरणी ६२.जलतरण ६४.पात ६५.घर ६६.मतदार ६८.आयकर ६९.पळपुटा ७०.घरंदाज ७२.माहितगार ७५.पदर ७७.रास ७९.शीरा ८०.वतनदार ८१.गेला बाजार

### उभे उत्तर

१.रक्षण ३.आत ४.पाणलोट ५.लहानी ६.फौजी ७.जतन ८.रस ९.तंग १०.गरम १३.रयत १५.नजरानजर १६.धनदाट १८.भरधाव २०.सरबत २२.जनपथ २३.उदरभरण २६.नवरा २८.मद ३०.रव ३४.रखवालदारी ३५.सर्वनाश ३६.ईश्वरचरणी ३८.यमराज ४१.शक्य ४२.नवरोज ४४.नव ४७.बनकर ५०.कुरापत ५२.रवा ५३.सकल ५४.गदाधर ५५.भारतीय ५६.हजर ५८.सणवार ६०.बाबत ६३.तजवीज ६४.पातळ ६५.घरघर ६६.मधमाशी ६७.दानत ६८.आटा ६९.परत ७१.दादला ७३.हिरा ७४.गाव ७६.दगा ७७.राजा ७८.सर

# चंदेरी दुनिया



## संजय दत्तच्या आखिरी सवालचा टीझर प्रदर्शित

रणबीर कपूरच्या 'रामायण'चा टीझर चर्चेत असतानाच, आज संजय दत्तच्या आगामी 'आखिरी सवाल' या चित्रपटाचा टीझरही प्रदर्शित झाला. हा टीझर भारताच्या इतिहासातील विविध घटनांचा संदर्भ देऊन अनेक प्रश्न निर्माण करतो. तसेच, तो चित्रपटाच्या कथेबद्दलही काही संकेत देतो.

अभिनेत्री सोनाली बेंद्रे आणि तिच्या पतीवर जमीन बळकावल्याचा आरोप

१ मिनिट ५२ सेकंदांचा हा टीझर संजय दत्तच्या व्हॉईस-ओव्हरने सुरू होतो. यामध्ये, तो द्रौपदीचे वडील द्रुपद यांची कथा सांगतो, ज्यांनी गुरू द्रोणाचार्यांकडून झालेल्या अपमानाचा बदला घेण्यासाठी आपला मुलगा धृष्टद्युम्न याला त्यांच्याकडे शिकायला पाठवले. या कथेनंतर, टीझरमध्ये एका प्राध्यापकाच्या भूमिकेत संजय दत्त आणि विकी हेगडेने साकारलेली नमाशी चक्रवर्ती यांची ओळख करून दिली जाते.




पाकिस्तानहून आलेल्या सीमा हैदरने आपल्या मुलाचे नाव 'भारत' ठेवले

शूटिंगदरम्यान प्रभू देवाला आला होता पक्षाघाताचा झटका; उपचार आणि विश्रांतीनंतर केले जोरदार पुनरागमन-ङडज ठए-ऊ शूटिंगदरम्यान प्रभू देवाला आला होता पक्षाघाताचा झटका; उपचार आणि विश्रांतीनंतर केले जोरदार पुनरागमन

'आखिरी सवाल' ही विकी (नमाशी चक्रवर्ती) या तरुण विद्वानाची कथा आहे, ज्याचा त्याचे गुरू प्राध्यापक गोपाल नाडकर्णी (संजय दत्त) यांच्यासोबतचा शैक्षणिक वाद एका दूरचित्रवाणीवर प्रसारित होणाऱ्या संघर्षात बदलतो. ही कथा ऐतिहासिक घटनांचा संदर्भ देत, पिढीतील फरक आणि सत्याचा शोध यांसारख्या मुद्द्यांना हाताळते. कथेच्या केंद्रस्थानी गुरू-शिष्य संघर्ष आहे, जो एका मोठ्या वादात रूपांतरित होतो. टीझरमध्ये महात्मा गांधींची हत्या, आरएसएसवरील बंदी आणि बाबरी मशीद विध्वंस यांसारख्या अनेक ऐतिहासिक घटनांचे संदर्भ दाखवले आहेत.

संजय दत्त आणि नमाशी चक्रवर्ती यांच्या व्यतिरिक्त, चित्रपटातील उर्वरित कलाकारदेखील टीझरमध्ये दिसत आहेत. यामध्ये समीरा रेड्डी, अमित साध, नीतू चंद्रा आणि त्रिधा चौधरी यांसारख्या कलाकारांची झलक पाहायला मिळते. अभिजीत मोहन वरांग दिग्दर्शित 'आखिरी सवाल' हा चित्रपट ८ मे रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल. या चित्रपटाची निर्मिती निखिल नंदा आणि संजय दत्त यांनी केली असून, पुनीत नंदा, डॉ. दीपक सिंग, गौरव दुबे आणि उज्ज्वल आनंद हे चित्रपटाचे सह-निर्माते आहेत.

## सासू-सुनेच्या नात्यावर आधारित मनोरंजक कप बशी

सासू-सुनेचं नातं हे एव्हरग्रीन असतं. या नात्यामध्ये प्रेम, आदर, राग, रुसवे फुगवे अशा वेगवेगळ्या भाव-भावना असतात. याच नात्यातली एक वेगळी गोष्ट आता ङ्कप-बशीफ या आगामी चित्रपटात पाहता येणार आहे. वैभव चिंचाळकर दिग्दर्शित हा चित्रपट ५ जूनला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार असून, या चित्रपटाचं पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं.




चित्रपटाची पटकथा, संवाद चेतन सैंदाणे यांनी लिहिलेले आहे. चित्रपटात अभिनेत्री निर्मिती सावंत, पूजा सावंत, अभिनेता ऋषी मनोहर, नयना आपटे, अनंत जोग, राहुल रानडे, आनंद इंगळे, चिन्मय शिंत्रे, पूर्णिमा तळवलकर, आनंद काळे अशी तगडी स्टारकास्ट आहे. गीतकार गुरु ठाकूर, अरूण आणि अरूणा हे दांपत्य त्यांच्या मुलाच्या लग्नासाठी मुलगी शोधत असतात; परंतु अरूणा यांच्या अध्यात्मिक गुरूनं सूनेबाबत काही अटी सांगितल्या आहेत. त्या अटींनुसार अरूणा मुलगी शोधत असतात. त्यांना तशीच मुलगी सापडते का? नक्की अशी कोणती अट आहे? त्यांचे पुढे लग्न जुळतं की नाही? अशा धमाल आशयसूत्रावर कप बशी हा चित्रपट आधारित आहे.

## रामाची भूमिका साकारण्याबद्दल रणबीर कपूर म्हणाला.....

प्रभू रामाच्या भूमिकेतील रणबीर कपूरचा लूक अखेर समोर आला आहे आणि त्यामुळे प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. चित्रपटाच्या निर्मात्यांनी हनुमान जयंतीच्या निमित्ताने प्रभू रामाच्या भूमिकेतील रणबीरचा शक्तिशाली लूक सादर केला, जो जगभरात चर्चेचा विषय बनला आहे. या लूकबद्दल बोलताना रणबीर कपूर म्हणाला की, हा अनुभव त्याच्यासाठी अत्यंत नम्र करणारा होता आणि यामुळे त्याला प्रभू रामाचा साधेपणा आणि पवित्रता समजून घेण्याची एक गहन संधी मिळाली.

रामाची भूमिका साकारणे: रणबीर कपूरचा वैयक्तिक अनुभव-रणबीर कपूरने या भूमिकेबद्दल आपले विचार व्यक्त करताना सांगितले, मला नाही वाटत की मी प्रभू रामाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी आलो आहे, तर त्यांच्याकडून शिकण्यासाठी आलो आहे. त्यांच्यामध्ये एक असा साधेपणा आणि पवित्रता आहे जी क्वचितच पाहायला मिळते. आणि ती पवित्रता समजून घेणे आणि ती आत्मसात करण्याचा प्रयत्न करणे हा एक अत्यंत नम्र करणारा अनुभव होता. रणबीर कपूरने या अनुभवाला आपल्या कारकिर्दीचा एक मौल्यवान भाग आणि कोणत्याही स्तरावरील अभिनेत्यासाठी एक खूप खास अनुभव असल्याचे वर्णन केले.रणबीर कपूर व्यतिरिक्त, साई पल्लवी, यश, रवी दुबे, सनी देओल आणि लारा दत्ता हे देखील या महाकाव्यीय चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहेत. चित्रपटाचे निर्माते नमित मल्होत्रा आणि दिग्दर्शक नितेश तिवारी यांनी हा चित्रपट भव्य प्रमाणात बनवण्याचे वचन दिले आहे, जो भारतीय चित्रपटसृष्टीत एक नवीन मैलाचा दगड ठरेल.



## जालंधरच्या जस्मिन सँडलसच्या बुलंद आवाजाची जगभरातील श्रोत्यांना भुरळ

एकेकाळी क्लबच्याबाहेर सीडी विकणारी एक मुलगी आज देशातील सर्वाधिक लोकप्रिय चित्रपटातील गाण्यामुळे फेवरेट झाली आहे. पूर्वी क्लबमधील १५ लोकांपुढे गाणारी जस्मिन सँडलस अमेरिकन गायिका असली तरी मुळची जालंधर गावातून येते. आज आपण या जास्मिनचा तिच्या वाजता प्रमाणेच असलेला कणखर प्रवास जाणून घेऊ. क्लबच्या बाहेर सीडी वाटण्यापासून ते 'धुरंधर'पर्यंत: जस्मिन सँडलसचा प्रवास प्रत्येकाला प्रेरणा देणारा आहे. तिच्या निर्भीड



आवाजामुळे ती नुसती व्हायरल नाही तर कित्येकांच्या प्लेलिस्टची ती आता 'फेवरेट सिंगर' झाली आहे. धुरंधर चित्रपटातील 'जाईये सजणा' या गाण्यातून तिच्या आ-वाजाची झलक दिसते. या गाण्यावर समाज माध्यमांवर एक लाख ४० हजारापेक्षा जास्त रिल्स झाली आहेत. अतिशय हृदयस्पर्शी ओळी आणि अगदी सोप्या पद्धतीने केलेलं लेखन आणि त्याला जास्मिनच्या आव-ाजाची जोड हे अतिशय आदर्श मेळ या चित्रपटाच्या निमित्ताने झालेला दिसतो. सतींदर पाल सिंग यांनी हे काव्य लिहले आहे. जस्मिन सँडलसने संगीत क्षेत्रात कारकीर्द घडवताना निर्भीडपणे पारंपरिक मार्गावरून न जाता स्वतःचा नवा मार्ग केला. धुरंधर या चित्रपटाने सुरवा-तीपासूनच नवे विक्रम नोंदवले आहेत. पण थोडे बारकाईने या चित्रपट निर्मिती आणि कलाकारांची यादी पहिली तर ते कोणीच 'नेपोटिझम' टॅग खाली येणारे नाहीत. शाश्वत सचदेव, जस्मिन या सारखी खरच प्रतिभा असलेली माणसे दिग्दर्शक आदित्यला मिळाली त्याने देखील प्रतिभा ओळखून त्यांचा सहभाग यात घेतला. प्रतिभेला कोणतीही सीमा नसते, योग्य वेळ आली की, ती उजळतेच हेच खरे.

जास्मिन सँडलस भारत सोडून परदेशात स्थायिक झाली

२० रुपयांना सीडी विकण्यापासून ते धुरंधरमध्ये एक विक्रम मोडणारा अल्बम सादर करण्यापर्यंत, जस्मिन सँडलसचा प्रवास हा तिच्या धडाडीला शोभेल असाच आहे. जस्मिनचा जन्म जालंधरमध्ये झाला असून ती लहानपणापासून कविता लिहायची. या लेखनाला तिच्या आईने तिला प्रोत्साहन दिले होते, जी तिला नेहमी सांगायची की, आपला आवाज कधीही दाबून ठेवू नकोस. पण वयाच्या १३ व्या वर्षी, सर्व काही बदलले. ती कॅलिफोर्नियाला गेली. मित्रमैत्रिणी नसताना आणि स्वतःची ओळख नसताना, जस्मिनने संगीताकडे वळली.

तिने स्वतःची गाणी लिहायला आणि रेकॉर्ड करायला सुरुवात केली, ज्यात तिने आपल्या पंजाबी मूळ संगीतापासून प्रेरणा घेत गेली आणि याला जोड दिली ती 'वेस्ट कोस्ट हिप-हॉप'ची. तिथेच तिला तिचे खरे ध्येय सापडले. खिशात फक्त २० डॉलर आणि कोणतीही पर्यायी योजना नसताना, जस्मिनने थांबण्यास नकार दिला. ती तासंतास क्लबच्या बाहेर उभी राहून आपल्या सीडी वाटत असे, कोणीतरी ऐकेल या आशेने.

२००८ मध्ये, एका निर्मात्याने अखेर तिला संधी दिली. तिचे पहिले गाणे, 'मुस्कान', पंजाबमध्ये हिट झाले. आणि मग जस्मिनने मागे वळून पाहिले नाही. 'यार ना मिले'. 'इलिगल वेपन'. 'गुलाबी'. एकापाठोपाठ ती लोकप्रिय झाली. बदलत्या काळानुसार, इंडस्ट्रीला तिचे गाणे एका विशिष्ट पद्धतीने हवे होते. पण जस्मिनने शांतपणे, तिच्या संगीताच्या माध्यमातून बंड करत तिचा नवा मार्ग आखत होती.

समाज माध्यमांवर तिने २०१२ मधील एक फोटो शेअर केला आहे ज्यात दिल्लीतील एका क्लबमध्ये ती अवघ्या १५ लोकांसमोर गात होती. त्यात ती म्हणते,कीर्ती आणि संपत्ती कोणालाही बदलत नाहीत, उलट त्या तुमचे व्यक्तिमत्व अधिक खुलवतात. माझे चाहते मला माझे जुने फोटो आणि व्हिडिओ पाठवत आहेत आणि यामुळे मला खूप आनंद होत आहे. मी इतकी ग्लॅमरस नसतानाचा माझा प्रवास तुम्ही पाहिलात, त्याबद्दल धन्यवाद. आतापर्यंतचा प्रवास किती सुंदर होता, याची आठवण करून दिल्याबद्दल धन्यवाद. तिने पुढे लिहिले, मी माझ्या जुन्या आयुष्याचा त्याग करून नवीन आयुष्य स्वीकारले. बस्स एवढंच.

'धुरंधर'ची वाटचाल -पहाटे ४ वाजता, पूर्णपणे थकलेली आणि अगदी कमी वेळ शिल्लक असताना, तिने 'जय्ये सजना' रेकॉर्ड केले. ते गाणे कोणतेही बंधन नसलेले आणि कोणतीही माफी न मागणारे होते. बाकीचे काम इंटरनेटने केलेच. क्लिप्स व्हायरल झाल्या. गाण्याचे बोल कॅप्शन बनले. तिचा आवाज एक 'मूड' बनला. आणि बघता बघता, जस्मिन आता फक्त एक कलाकार राहिली नव्हती. ती एक आवाज बनली होती. एक शक्ती. तिच्या स्वतःच्या संगीताची राणी. कोणतेही लेबल तिला चौकटीत बसवू शकले नाही. कोणताही नियम तिला परिभाषित करू शकला नाही. कारण तिने पारंपरिक मार्ग शब्दशः फाट्यावर मारून इंडस्ट्रीचे नियम नव्याने लिहिले.थोडे या गाण्याविषयी

'जाइये सजना' या गाणे बोल पंजाबी सुफी संगीतातील आहे. हे नेहमीच्या बॉलिवूड ब्रेकअप गाण्यांपेक्षा खूपच वेगळे आहे.

## नशा ही नशा है ये जलवा...

जीवनदर्शी चित्रकथा : राजभूषण सहस्रबुद्धे ९८२२२०६०२६

जिस्मों का है ये जलवा
शोहरत भी दे ये जलवा
मज़ा ही मज़ा, नशा ही नशा ये जलवा
इसने सबको भरमाया,
है अजब इसकी माया
कोई भी बच ना पाया,
आसमान भी दिखलाया
ज़मीन पे भी ले आया
क्या ना इसने करवाया,
ये जला दे दिलों में चिंगारियाँ
ये जलवा, ये जलवा, फैशन का है ये जलवा

फॅशन (२००८) या चित्रपटाचे मूळसूत्र वर्णन करणार्या गीताच्या काही महत्त्वाच्या ओळी. चमकत्या झगमगाटी माध्यमांच्या जगात येण्यास कलाकारांना आकर्षित आणि प्रसिद्धीलोलुपतेने विवशही करतात. त्याची पराकोटीची सीमा दाखवणारी ढकए डणइडढ-छउए(२०२४) ही एक भयावह तरीही विलक्षण अद्भूत कलाकृती.

एलिझाबेथ स्पार्कल, नावाप्रमाणेच या झगमगाटी दुनियेतील एक चमकती तारका. खूप वर्षांपासून रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारी टीव्हीवरील 'तंदुरुस्ती कार्यक्रमा'ची सूत्रधार आणि सुंदर, आकर्षक, सुडौल शरीरयष्टीची मॉडेल; पण ती आता पन्नाशीला आलीय. त्यामुळे तिच्या कार्यक्रमाचा निर्माता तिला त्या कार्यक्रमातून काढू इच्छितो. आता त्याला हवीय एलिझाबेथ पेक्षा सुंदर आकर्षक बांध्याची पण, तरुण नवी मॉडेल.

तिचे जागोजागी लावलेले मोठमोठे जाहिरातींचे फलक उतरवले जाण्याने तिच्या मनावर आघात होतो. साहजिकच तिच्या मनात आता असुरक्षिततेची भावना जागृत होते. तिच्या गाडीचा अपघात होतो. सुदैवाने ती वाचते. दवाखान्यातून घरी जाण्यापूर्वी तेथील एक पुरुष नर्स तिच्या खिशात एक पेनड्राइव आणि चिठ्ठी ठेवतो. ती असते काळ्या बाज-ारात मिळणार्या वृद्धत्वाला नाकारणार्या 'ढहश डींलीीरपलश' या एका जबरदस्त औषधाची जाहिरात. जे सेवन करणार्याला स्वतःचे तरुण, अधिक सुंदर, अधिक परिपूर्ण रुप देण्याचे आश्वासन देते. एलिझाबेथ 'द सबस्टन्स'ची दिलेल्या क्रमांकावर फोनने मागणी करते. तिला कोणीही व्यक्ती प्रत्यक्ष संपर्कात न येता ते औषध मिळते. ते असते केवळ एकदाच अनुभवायचे सीरम इंजेक्शन. ज्याचे काही नियम, पथ्ये असतात.

प्रसिद्धी टिकवण्याच्या, तरुण होण्याच्या लाल-सेने ती निर्धाराने स्वतःला ते टोचून घेते. भयंकर शारीरिक घुसळणीनंतर ती बेशुद्ध होते. अन्, तिच्या पाठीतून सर्पाने कात टाकावी तशी एक सुंदर, आकर्षक नवयौवना बाहेर पडते; पण मूळ एलिझाबेथपेक्षा स्वतंत्र रूपाची. जी स्वतःसाठी 'स्यु' असे तिचे नवीन नाव निवडते. स्यु हे एलिझाबेथचेच दुसरे रूप; परंतु, औषधाच्या अटीप्रमाणे ते एकेवेळी फक्त एक आठवड्यासाठीच राहू शकते. एलिझाबेथ आणि स्यु दोघींची चेतना दर सात दिवसांनी अदलाबदल आवश्यक. म्हणजेच, एक आठवडा एलिझाबेथ तर दुसरा आठवडा स्यु. एकीचे शरीर बेशुद्धावस्थेत तर, दुसरी सचेतन अवस्थेत. अशा पद्धतीनेच त्यांना जगात वावरावे लागणार. स्युचे सौंदर्य, तारुण्य बिघडू नये, ते स्थिर ठेवण्यासाठीचे 'स्थिरकारी द्रव्य' बेशुद्धावस्थेतील एलिझाबेथच्या शरीरातून काढून स्युने रोजच्या रोज टोचून घेणे तर, बेशुद्ध शरी-राला आठवडाभर अन्न पुरवठा नळीद्वारे चालू ठेवणे आवश्यक असते.

आता स्यु कलाकार निवडीच्या ठिकाणी जाताच, तिच्या आकर्षक रूपामुळे तिची एलिझाबेथच्या जागी वर्णी लागते; पण ती स्वतःची अट घालते. 'मला आजीची देखभाल करण्यासाठी वरचेवर गावी जावे लागेल'. अर्थातच, ती मान्य होते, आणि एका रात्रीत स्यु जबरदस्त मोठी तारका बनते. जागोजागी तिचेच फलक झळकू लागतात. सर्वत्र चर्चेचा विषय बनते. हे पाहून स्यु खूप हुरळून जाते. तिला अजून एक नवीन वर्षाच्या मोठ्या कार्यक्रमाचे काम मिळते.यश, प्रसिद्धी बरोबरच नवनवीन तरुणांबरोबर




शरीरसुखही मनसोक्त उपभोगतानाच्या उन्मादात एकदा स्यु तिच्या स्थिरकारी द्रव्य बदलाला विलंब करते. ज्यामुळे चेतना जागृतीत एलिझाबेथचे हाताचे तर्जनीचे बोट अधिक वृद्ध राहते, आणि हा बदल कायमचा राहतो. एलिझाबेथ पुरवठादाराशी संपर्क साधते. जो स्पष्ट करतो की, बदलाला विलंब केल्याने मूळ शरीराचे अपरिवर्तनीय, जलद वृद्धत्व होणारच.

त्यामुळे एलिझाबेथ आणि स्यू हळ-ूहळू वेगळे व्यक्तिमत्त्व बनतात आणि एकमेकांचा द्वेष करू लागतात. स्यूच्या चेतना बदलाच्या वेळापत्रकाकडे वारंवार दुर्लक्ष करण्यामुळे नाराज एलिझाबेथ अजून अधिक वृद्धत्वाकडे झुकू लागते. तर, स्यू उपभोगात व्यत्यय येतोय म्हणून स्थिरकारी द्रव्याचा एकदाच खूप मोठा साठा काढून घेते. जेणेकरून पुन्हापुन्हा बदलाचे झंझटच नको.

परंतु, तीन महिन्यांनंतर, नवीन वर्षाच्या कार्यक्रमाच्या पूर्वसंध्येलाच तो साठाही संपतो. तेव्हा पुरवठादार 'चेतना बदल करणे' आवश्यक असल्याचे सांगतो. चेतना बदलताच एलिझाबेथ स्वतःला अतिशय विकृत, कुबड्या जर्जर म्हातारीत रूपांतरित झालेली बघते. ते आणखी वाढू नये म्हणून, एलिझाबेथ स्युला कायमचे संपवणारे वेगळे द्रव्य टोचतानाच नवीन कार्यक्रमाच्या प्रसिद्धीच्या लालसेने मध्येच थांबते आणि स्यूला पुन्हा जिवंत करते; पण एलिझाबेथचा सुरुवा-तीचा हेतू लक्षात आल्यामुळे स्यू कार्यक्रमात जाण्यापूर्वी एलिझाबेथला ठार मारते. आता एलिझाबेथशिवाय, स्यूचे शरीर झपाट्याने खराब होऊ लागते. म्हणून एकदाच वापरण्याच्या इशार्याला न जुमानता, ती शिल्लक असलेल्या अपुर्या 'डणइडढअछउए' सीरमचा वापर करून स्वतःची एक नवीन आवृत्ती तयार करू पाहते; पण होते भलतेच. एलिझाबेथ आणि स्यू दोघींच्या चेहर्यांसह एक विचित्र, विद्रुप, किळसवाणे, कुरुप, भयानक, रा-क्षसी उत्परिवर्तित शरीर तयार होते. त्यामुळे भयभीत झालेले प्रेक्षक शेवटी ते कार्यक्रमातच नष्ट करतात.

अमरत्वासाठी अधर्म करणार्या राक्षसांप्रमाणे भोगवादाने मानवाचे लोभीरूप दिवसेंदिवस विक्राळ बनत चालले आहे. झगमगाटी चमकदार माध्यमाचे आकर्षण, त्यात झळकणे, सुंदर दिसणे, अखंड तारुण्य प्राप्तीची धडपड, त्याचे जगणे केविलवाणे बनवत आहे. मेंदूला झिणझिण्या आणणार्या भन्नाट दृश्यात्मक परिणामांद्वारे कोराली फारजेटने ठर्शींशपसश नंतरची ही आपली दुसरी कलाकृती थेट हॉलिवूडमध्येच बनवली. तेही डेमी मूर या नामांकित अभिनेत्री सोबत. उत्तम व्यवसायासह उत्कृष्ट चित्रपट, दिग्दर्शन, पटकथा, रंगभूषा, अभिनेत्री अशी ऑस्करची पाच, गोल्डन ग्लोबची पाच नामांकने मिळवली. तीही भयपटासाठी, कारण, तिचे या माध्यमावरचे प्रभुत्व.

प्रमाणेच येथेही वास्तवापासून दूर असे एकलकोंडे आयुष्य, असुरक्षित, असंतुलित मानसिक अवस्था कथन करणारी लाल, पिवळ्या, नारंगी रंगातील एलिझाबेथच्या घराची रचना कल्पकतेचा, अभिव्यक्तिवादाचा उत्तम नमुनाच सादर करते. या रंगीन चमकत्या दुनियेतील कलाकारांचे एक स्वप्न असते, हॉलिवूडमधील बुलेव्हार्ड रस्त्यावर आयुष्यभराच्या कामाची दखल घेत, ते अमर करणारी स्वतःच्या नावाची एक तारांकीत फरशी बसवली जावी. चित्रपटाची सुरुवातच एलिझाबेथचेच नाव त्या डींीं थरश्रज्ञ`ष ऋराश मध्ये बसवलेय; पण तिच्यावरून हजारो लोक चालून तिला तडे गेले आहेत. शेवटी वृद्धत्वाचा निसर्ग नियम कोणालाच चुकलेला नाही. जुने वृक्ष जाऊन नवी रोपे उगवणारच. तरीही त्यास नाकारुन एलिझाबेथची तारुण्यासाठीची धडपड तिचे उर्वरीत आयुष्य नरक बनवते. ती अगतिकता डेमी मूरच्या अभिनयातून अंगावर शहारे आणते.

पण, याला कारणीभूत तर समाजच आहे, जो रोज बदलत्या सौंदर्याच्या व्याख्या, परिमाणांनी आज एकाला तर, उद्या दुसर्याला डोक्यावर घेऊन ना-चतोय. विज्ञानाचा अतिरेकी वापर करून निसर्गाशी पंगा घेत विनाश ओढवून घेत आहे. एलिझाबेथ आणि स्यु त्या अंतर्द्वंदाची केविलवाणी अपत्ये, माध्यम क्षेत्रातील स्त्रियांना 'वापरा अन् फेका' ची ७ दिवसांच्या बदलातून दिसणारी दोन प्रतीके. सोन्याचे अंडे देणारी कोंबडी एकदाच कापून खाणारी वृत्ती, तारुण्याचा मिथ्याभिमान म्हणजे स्यु, जी स्थिरकारी द्रव्यातून वृद्धत्वाची प्राणशक्ती खेचून ते अधिक दुःखद बनवते. म्हणजेच, हे मोहमयी जग स्त्रिला तिचे शरीर रूप, एक प्रकल्प म्हणून बघायला लावते, त्याची सतत देखभाल, सजवण्यास प्रवृत्त करतेय. स्त्री देखील स्वतःला 'पुरुषी नजरे'तूनच सुंदर दिसण्यासाठी धडपडतेय. त्यासाठीच गल्लोगल्ली सौंदर्याच्या टपर्या उघडल्यात. प्रत्येक जीव निसर्गाची एकमेवाद्वितीय सुंदर कलाकृती असूनही डमर्ईव्ह सारखाच आजही मर्यादा, नियम उल्लंघतोय. वृद्धत्वाला घाबरून क्षणभंगुर सुखासाठी, पुत्राला बळी देऊनही वासना शमलीच नाही म्हणणार्या ययाती सारखाच अतृप्त राहतोय. शेवटी हा मानवाचा तारुण्य, सौंदर्याचा अट्टाहास पाहून म्हणावेसे वाटते, उम्र की ढलान को, मशीन से रोक रहा है, कुदरत से जंग में, आज का सुकूँ खो रहा है।जीतनी है मौत, अजीबसी सनक सवार है,जवाँ रहने की जिद में, इंसान बूढ़ा हो रहा।

## लातूर शहराचा पाणी पुरवठा सुरळीत चालू

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील नागरिकांना कळविण्यांत येते की, लातूर शहरास धनेगाव धरण येथुन पाणी पुरवठा करण्यात येतो. परंतू मागील दोन दिवसापासुन वादळी वाऱ्यामुळे व अवकाळी पावसामुळे विद्युत पुरवठा बंद पडला होता त्यामुळे शहरास पाणी पुरवठा करण्यास अडचण निर्माण झाली होती.

तथापी शुक्रवार (दि.०३/०३/२०२६) रोजी दुपारी विद्युत पुरवठा सुरळीत चालु झाल्यामुळे आज पासून शहरास नियमित पाणी पुरवठा होणार आहे याची नागरिकांनी नोंद घ्यावी.

## धिरज देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त पोहरेगाव येथे सोमवारी मोफत कर्करोग निदान शिबिर

**रेणापूर/प्रतिनिधी :** लातूर ग्रामीणचे युवा नेते, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन तथा माजी आमदार मा. धिरजभैय्या विलासरावजी देशमुख साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून पोहरेगाव जिल्हा परिषद गटात भव्य मोफत कर्करोग (कॅन्सर) निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, ६ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० या वेळेत पोहरेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हे शिबिर पार पडणार आहे.

लातूर जिल्हा परिषद सदस्या सौ. मनिषा गंगासिंह कदम यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिरात गडदे हॉस्पिटल अँड कॅन्सर केअरचे तज्ज्ञ डॉक्टर एच. एस. गडदे रुग्णांची मोफत तपासणी करून मार्गदर्शन करणार आहेत. कर्करोग हा आजार वेळेत ओळखल्यास त्यावर प्रभावी उपचार करणे शक्य असते. त्यामुळे नागरिकांनी आपल्या आरोग्याबाबत जागरूक राहून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

या शिबिरात प्रामुख्याने तोंडात न बरे होणारे व्रण, शरीरावर किंवा स्त्रियांच्या बाबतीत स्तनांमध्ये जाणवणारी गाठ, अन्न गिळताना होणारा त्रास, सततचा खोकला, आवाजातील बदल, चामखीळ किंवा तिळाच्या रंगात होणारा बदल, तसेच महिलांच्या आरोग्याशी संबंधित विविध तक्रारींचे निदान केले जाणार आहे. पोहरेगाव गटातील सर्व पुरुष व महिलांनी, मग लक्षणे असोत वा नसोत, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून आपली आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन आयोजक सौ. मनिषा कदम यांनी केले आहे.

## अविनाश पाटील यांना कला गौरव पुरस्कार जाहीर



**लातूर/प्रतिनिधी :** आर्ट बिट्स फौंडेशन पुणे तर्फे संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा कलावंतास दिला जाणारा '' कला गौरव'' पुरस्कार या वर्षी युवा पिढीतील प्रसिद्ध तबला वादक अविनाश पाटील यांना जाहीत झाला आहे.या संस्थेचे हे पंचविसावे वर्ष आहे. पाटील हे पं. प्रमोद पाटील व पं. उमेश मोघे यांचे शिष्य आहेत. तबला वादनात त्यांनी संगीत अलंकार व एम ए तबला ही पदवी सुवर्णपदकासह प्राप्त केली आहे. सवाई गंधर्व संगीत महोत्सवासह देशातील अनेक मानाच्या संगीत महोत्सवात त्यांनी आपली कला सादर केली आहे.

परदेशातील दुबई, अबुधाबी, मालदीव, नेदरलँड्स, जर्मनी, फ्रान्स, स्वत्झर्लंड, डेन्मार्क, जर्मनी, पोलंड, स्पेन, आयर्लंड, स्कॉटलंड आणी लंडन येथी सोलो तबला वादन सादर करुन जगभरातील संगीत रसिकांची दाद मिळवली आहे. पाटील यांनी कला क्षेत्रात स्व कर्तुत्वावर अतिशय चिकाटीने, कष्टाने, जिद्दीने, मेहनतीने संघर्ष करुन आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वताची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भारतासह जगभरातील आज अनेक विद्यार्थी त्यांच्या कडे तबला वादनाची तालीम घेत आहेत.

## मार्चमध्ये युपीआयमधून नागरिकांनी केले कोटींचे व्यवहार; युपीआय ठरतोय वरदान

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताने सुरु केलेली यूपीआय ही डिजिटल प्रणाली आज जगभर पोहोचली आहे. हातात कॅश नसेल तर आता घाबरून न जात आपण बिनधास्तपणे डिजिटल प्रणाली वापरत आहोत. अगदी किराणा मालापासून ते लाखोंचे व्यवहार करण्यापर्यंत युपीआय वापरले जाते आहे. सणासुदीच्या काळात तर या व्यवहारांत अधिक भर पडते.

प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार मागच्या मार्च महिन्यात युपीआयने पेमेंट करणाऱ्यांची संख्या ही कोटींपर्यंत पोहोचली आहे. आणि एकट्या मार्च महिन्यात २२.६४ अब्ज असे विक्रमी संख्येने व्यवहार पार पडले आहेत. मार्च २०२५ महिन्याची तुलना करता, मार्च २०२६ मध्ये या व्यवहारांमध्ये १९ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तसेच फेब्रुवारीत एकूण २६.८४ लाख रुपये इतके व्यवहार झाले असून मार्च महिन्यात त्यात १० टक्क्यांनी वाढले आहेत.

# पिण्याच्या पाण्यासाठी बेंबडेवाडी ग्रामस्थांचा आक्रोश!

## तहसील कार्यालयावर भव्य घागर मोर्चा

**अहमदपूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील बेंबडेवाडी (ग्रामपंचायत गंगाहिप्परगा) येथील नागरिकांना सध्या पिण्याच्या पाण्याच्या गंभीर समस्येला सामोरे जावे लागत सून गेल्या शंभर वर्षा पासून पिण्याच्या पाण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या विहिरीवरून पाणी घेण्यास मज्जाव केल्याच्या निषेधार्थ तातडीने विहिर खूली करण्यात यावी यासाठी सबंध गावकऱ्यांनी एकत्र येते येथील तहसील कार्यालयावर सम्राट मित्र मंडळाच्या वतीने युवकनेते डॉ.सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली घागर मोर्चा काढण्यात आला.









गावातील सर्वसामान्य ग्रामस्थांनी स्वतःच्या कष्टाने व आर्थिक सहभागातून गेल्या कित्येक वर्षा पूर्वी सार्वजनिक वापरासाठी विहीर खोदून गावाला पाणीपुरवठा केला होता. मात्र, सदर विहिरीची नोंद सातबाऱ्यावर चुकीच्या पद्धतीने झाल्यामुळे आणि संबंधित शेतकऱ्यांकडून पाणीपुरवठा रोखण्यात येत असल्याने ग्रामस्थांवर पाण्यासाठी अक्षरशः संघर्ष करण्याची वेळ आली आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून ही विहीर गावाच्या जीवनवाहिनीसारखी काम करत होती. ग्रामस्थांनी श्रमदान आणि आर्थिक योगदान देऊन ही सुविधा उभी केली होती. परंतु गेल्या काही दिवसांपासून अचानक पाणीपुरवठा खंडित करण्यात आल्यामुळे महिलांना, ज्येष्ठ नागरिकांना आणि लहान मुलांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. पाण्याच्या एका थेंबासाठी नागरिकांची धडपड सुरू असून प्रशासनाच्या उदासीनतेमुळे संतापाची लाट उसळली आहे.

या गंभीर परिस्थितीत ग्रामस्थांनी अनेक वेळा प्रशासनाकडे लेखी तक्रारी व निवेदने देऊनही कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे आता ग्रामस्थांनी आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला आहे.

या मोर्चा च्या माध्यमातून

ग्रामस्थांनी मागण्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे

चुकीच्या नोंदीची दुरुस्ती करून विहीर सार्वजनिक नोंदविण्यात यावी,विहिरीतून तात्काळ पाणीपुरवठा सुरू करण्यात यावा,गावासाठी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची योजना याच विहीरी वरून मंजूर करावी,विहिरीला जाण्यासाठी गाडी रस्ता उपलब्ध करून द्यावा,

बेंबडेवाडी तळ्याच्या क्षेत्रातील बूडीत क्षेत्र ७/१२ वरून कमी करून प्रत्येक्षात तळ्याची जागा शासनाने ताब्यात घ्यावी.

या मागण्यांसाठी आज सकाळी येथील नगर परिषद मैदान येवून मोर्चाला सूरूवात करून शहराच्या मूख्य मार्गावरून हा मोर्चा तहसील कार्यालयावर धडकला.या नंतर या परिसरात नागरिकांनी ठिय्या अंदोलन सूरू केले.जोपर्यंत प्रश्न सुटत नाही तोपर्यंत तीव्र आंदोलन छेडण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.

''पाणी हा आमचा मूलभूत हक्क आहे, तो कुणाच्याही दयेवर अवलंबून राहू शकत नाही'' अशी भावना व्यक्त करत ग्रामस्थांनी प्रशासनाला शेवटचा इशारा दिला आहे.

या मोर्चाचे नेतृत्व डॉ. सिध्दार्थकुमार सूर्यवंशी यांनी केले तर या मोर्चा मध्ये शेकडो महिला पूरूष युवक यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

शेवटी तहसीलदार अहमदपूर यांच्या लेखी पत्रानंतर अंदोलन मागे घेण्यात आले.

## जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेची तालुकास्तरीय परीक्षा उत्साहात संपन्न; विद्यार्थ्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग

**बीड/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही महापुरुषांच्या जीवनकार्यावर आधारित जिल्हास्तरीय सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धे अंतर्गत तालुकास्तरीय परीक्षा सोमवार, दि. ३० मार्च २०२६ रोजी जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये उत्साहात पार पडली.



तालुका बीडसाठी तुलसी संगणक महाविद्यालय येथे परीक्षा केंद्र निश्चित करण्यात आले होते. यावेळी आयु. मनोज वाघमारे, आयु. सुमेध जोगदंड, अशोक ठोकळ, तानाजी शिनगारे, अभिजीत जाधव आदींच्या प्रमुख उपस्थितीत उद्घाटन समारंभ संपन्न झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. प्रकाश ढोकणे यांनी केले.

या स्पर्धेत जिल्हाभरातून सुमारे हजारो विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती रुजवणे तसेच चिकित्सक अभ्यासाची वृत्ती विकसित करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा स्तरावर प्रा. शशिकांत जावळे, आयु. प्रणित सरवदे, आयु. सुमेध जोगदंड, प्राचार्य प्रदीप गाडे, आयु. भारत मगर, आयु. प्रवीण तरकसे, अ‍ॅड. राजेश शिंदे, आयु. महादेव इनकर, प्रा. अशोक गायकवाड यांनी उत्कृष्ट नियोजन केले.

तसेच तालुका समन्वयकांच्या माध्यमातून सर्व तालुक्यांत परीक्षा सुरळीत पार पडली. यामध्ये शिरूर (अनिता लाटे, जयेंद्र निकम), आष्टी (प्राचार्य रत्नकांत निकाळजे, डॉ. चंद्रकांत साळवे), पाटोदा (प्राचार्य अस्मिता जावळे, पृथ्वीराज जावळे), वडवणी (बाबा जाधव, दीपक वडमारे), धारूर (रुद्र सर, सिरसाठ सर), परळी (गायकवाड सर), केज (दादा गायकवाड), माजलगाव (प्रमोद साळवे, अमोल राऊत), गेवराई (भारत मगर, सदाफुले) तसेच बीड (प्रा. प्रकाश ढोकणे) यांनी मोलाची भूमिका बजावली.

तालुकास्तरावर निवड झालेल्या टॉप-१० विद्यार्थ्यांसाठी जिल्हास्तरीय अंतिम परीक्षा रविवार, दि. ५ एप्रिल २०२६ रोजी तुलसी संगणक महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. पात्र विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## शिडीवरुन पाय घसरला अन सगळे संपले

**पुणे/प्रतिनिधी :** हवेली तालुक्यातील वरदाडे येथे खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात एक धक्कादायक घटना घडली. यात पुलाचे काम सुरू असताना एका २२ वर्षीय ऑपरेटरचा पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला आहे. विजय कुमार (वय २२, मूळ रा. प्रयागराज, उत्तर प्रदेश) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो रिंगरोडच्या कामावर बुलडोझर ऑपरेटर म्हणून कार्यरत होता. बुधवारी सायंकाळी ६ च्या सुमारास ही घटना घडली. वरदाडे येथे सध्या रिंगरोडसाठी पुलाचे काम सुरू आहे. विजय कुमार हा आपल्या बुलडोझरवर चढत असताना अचानक शिडीवरून त्याचा पाय घसरला. तो थेट नदीपात्रातील खोल पाण्यात कोसळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी बचाव कार्य सुरू केले. मात्र दुर्दैवाने त्याचा जीव वाचू शकला नाही.

# नवसाला पावणाऱ्या शिवलीच्या श्री हनुमान यात्रेला उत्साहात प्रारंभ

## शतकानुशतके तेवत असलेला दिवा भक्तांसाठी श्रद्धेचा केंद्रबिंदू







**लातूर/प्रतिनिधी :** औसा तालुक्यातील शिवली या पवित्र भूमीत नवसाला पावणाऱ्या श्री हनुमान यात्रेला यंदा मोठ्या भक्तिभावात आणि उत्साहात सुरुवात झाली आहे. लातूर जिल्ह्याच्या सीमेवरील हे जागृत देवस्थान आज हजारो भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र बनले असून यात्रेच्या निमित्ताने पंचक्रोशीतील तसेच राज्याच्या कानाकोपऱ्यातून भाविकांची मोठी गर्दी उसळलेली दिसत आहे.

औसा तालुक्यातील शिवली येथील श्री हनुमान मंदिराची सर्वात मोठी वैशिष्ट्य म्हणजे येथे गेल्या शंभर-दोनशे वर्षांपासून अखंड तेवत असलेला दिवा. काळाच्या ओघात अनेक बदल झाले, पण हा दिवा आजही तसाच अखंड प्रज्वलित आहे. या दिव्यामुळेच या यात्रेला एक वेगळीच पवित्रता आणि ख्याती लाभली आहे. ''नवसाला पावणारा हनुमान'' म्हणून या देवस्थानाची ख्याती सर्वदूर पसरली असून भाविक आपल्या मनोकामना पूर्ण करण्यासाठी आणि नवस फेडण्यासाठी मोठ्या श्रद्धेने येथे येतात.

दरवर्षी हनुमान जयंतीनंतर येणाऱ्या पहिल्या शनिवारपासून यात्रेला सुरुवात होते. परंपरेनुसार, पहाटे गावातील भाविक आपल्या घरापासून मंदिरापर्यंत दंडवत घालत येतात. पहाटे ४ वाजल्यापासून दुपारी १२ वाजेपर्यंत दही-दुधाचा अभिषेक करण्यात येतो. त्यानंतर श्री हनुमानाच्या मूर्तीला सोन्या-चांदीच्या अलंकारांनी सजवून महापूजा केली जाते.

दुपारनंतर गावातील तसेच सासरी गेलेल्या महिला आपल्या माहेरच्या आठवणींनी भारावून वाजत-गाजत मंदिराकडे येतात आणि लोटांगण घालून आपल्या श्रद्धेची प्रचिती देतात. दिवसभर मंदिर परिसर भक्तांनी गजबजलेला असतो, आणि वातावरणात भक्तीभाव, नामस्मरण आणि आनंदाची लहर पसरलेली असते.

यात्रेच्या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

४ एप्रिल रोजी पहाटे २ वाजल्यापासून दंडवत, सकाळी अभिषेक, अलंकार व महापूजा, सायंकाळी प्रसाद वितरण आणि रात्री हरिजागर व भजनाचा कार्यक्रम होणार आहे.

५ एप्रिल रोजी भव्य भारूड कार्यक्रम,

६ एप्रिल रोजी मल्लांचा कुस्तीचा थरार आणि सायंकाळी भक्तिमय ''श्री लक्ष्मण शक्ती'' सोहळा पार पडणार आहे.

तर ७ एप्रिल रोजी श्रीरामायणाची महाआरती व सर्व भाविकांसाठी महाप्रसाद देऊन यात्रेची सांगता होणार आहे.

शिवलीची ही यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक एकतेचा सुंदर संगम आहे. अखंड तेवत असलेला दिवा आणि भक्तांच्या ओसंडून वाहणाऱ्या भावनांमुळे ही यात्रा प्रत्येकाच्या मनात विशेष स्थान निर्माण करते.

## स्पोर्ट्स कोट्यातून अमर येमलेची पोलीस दलात दमदार एन्ट्री!

### दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्त

**लातूर/प्रतिनिधी :** क्रीडा क्षेत्रातील सातत्यपूर्ण मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर दयानंद वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी अमर येमले याने मोठे यश संपादन केले आहे. स्पोर्ट्स कोट्यामधून त्याची नांदेड येथे पोलीस कॉन्स्टेबल पदावर नियुक्ती झाली असून, त्याच्या या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

अमर येमले हा महाविद्यालयाचा क्रीडाप्रेमी व मेहनती विद्यार्थी असून, अ‍ॅथलेटिक्स क्षेत्रात त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या शैक्षणिक व क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. दयानंद वाणिज्य महाविद्यालयाने आजवर विविध क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांचे करिअर घडविले असून, चार्टर्ड अकाउंटंट, प्रशासकीय अधिकारी तसेच यशस्वी उद्योजक घडविण्याची गौरवशाली परंपरा कायम ठेवली आहे. अमर येमलेचे यश हे त्याच परंपरेचे उत्कृष्ट उदाहरण ठरत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयात शुक्रवारी विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते अमर येमलेचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपप्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण तसेच क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे उपस्थित होते. अमर येमलेच्या यशामागे क्रीडा विभाग प्रमुख डॉ. अशोक वाघमारे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच अमरने हे यश संपादन केल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.




प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

## स्पर्धा परीक्षेतून शिक्षकांची निवड; शाळेत गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध- जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील



कळंब (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये येत्या शैक्षणिक वर्षापासून सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना राणाजगजितसिंह पाटील यांनी केली. त्या नायगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आयोजित गुढीपाडवा 'प्रवेश वाढवा' अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी बोलत होत्या.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, नायगाव यांच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चना राणाजगजितसिंह पाटील, जिल्हा परिषद उपाध्यक्षा उषा गायकवाड, अर्थ व बांधकाम सभापती सिद्धेश्वर कोरे, कृषी व पशुसंवर्धन सभापती भाऊसाहेब खरसडे, समाजकल्याण सभापती विश्वास कोकणे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) डॉ. रवींद्र खंदारे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना अध्यक्षा अर्चना पाटील यांनी सांगितले की, जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांची निवड ही स्पर्धा परीक्षेद्वारे होत असल्याने गुणवत्तापूर्ण शिक्षण येथे उपलब्ध आहे. पालकांची इंग्रजी माध्यमाबाबतची अपेक्षा लक्षात घेऊन जूनपासून सर्व शाळांमध्ये सेमी इंग्रजी अभ्यासक्रम सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी शिक्षण आयुक्तांची परवानगी घेतली जाणार आहे. तसेच, शाळांच्या गरजेनुसार टप्प्याटप्प्याने १२ नवीन वर्गखोल्यांना मंजुरी दिली जाणार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्रप्रमुख महादेव मेनकुदळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मीरा रुकमे व राम आरडले यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक रमेश नाईकवाडी यांनी मानले. या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील पदाधिकारी, शिक्षक, पालक व गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवेश घेतलेल्या लेकरांच्या आनंदाने गाव दुमदुमले प्रवेश घेतलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांची गावातून काढलेली मिरवणूक हा सोहळ्याचा सर्वात भावनिक क्षण ठरला. बैलगाडी, ट्रॅक्टर, लेझीम, टाळ-मृदंगाच्या गजरात निघालेल्या या मिरवणुकीत लहानग्यांच्या चेहऱ्यावरचे निरागस हास्य सर्वांच्या मनाला भावून गेले. जेसीबीमधून करण्यात आलेली पुष्पवृष्टी जणू त्यांच्या स्वप्नांवरच फुलांचा वर्षाव करत होती. उपाध्यक्षा उषा गायकवाड यांनी गुढीपाडवा प्रवेश अभियान हा अभिनव उपक्रम असल्याचे सांगत, भविष्यात बालकांच्या विकासासाठी आवश्यक योजना शिक्षण विभागामार्फत राबवण्याचे आश्वासन दिले.

## प्रियदर्शनी अर्बन बँकेची आर्थिक घोडदौड; एनपीए शून्यावर, आर्थिक स्थिती अधिक भक्कम



कळंब (प्रतिनिधी)- येथील प्रियदर्शनी अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लि . ने ३१ मार्च २०२६ अखेर आर्थिक प्रगतीचा नवा टप्पा गाठत बँकेची आर्थिक स्थिती अत्यंत मजबूत आणि समाधानकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. चालू आर्थिक वर्षात बँकेने आर्थिक स्थैर्यासोबतच विश्वासार्हतेतही उल्लेखनीय वाढ नोंदवली असून व्यवस्थापनाची दूरदृष्टी, काटेकोर नियोजन, पारदर्शक कारभार आणि सर्व घटकांच्या सक्रिय सहभागामुळे हे यश साध्य झाल्याचे बँक प्रशासनाने सांगितले.


यंदाच्या आर्थिक वर्षातील सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे बँकेने थकबाकी कर्ज अर्थात एन.पी.ए. पूर्णपणे शून्य टक्क्यांवर राखण्यात यश मिळवले आहे. सहकारी बँकिंग क्षेत्रात एनपीए शून्यावर ठेवणे ही अत्यंत कठीण बाब मानली जाते; मात्र प्रभावी कर्जवाटप धोरण, वेळोवेळी राबवलेल्या वसुली मोहिमा आणि कर्जदारांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे बँकेने हे यश संपादन केले. बँकेच्या आर्थिक पत्रकानुसार ठेवी, कर्जवाटप, नफा आणि कार्यकारी भांडवल या सर्वच घटकांत लक्षणीय वाढ झाली आहे. आर्थिक शिस्त आणि नियोजनबद्ध व्यवस्थापनामुळे बँकेची विश्वासार्हता अधिक बळकट झाली असून ग्राहकांचा प्रतिसादही वाढला आहे.

बँकेने आर्थिक व्यवहारांपुरते मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकीही प्रभावीपणे जपली आहे. शेतकरी, लघुउद्योग, गरजू घटक यांना आर्थिक सहाय्य देतानाच विविध सामाजिक उपक्रमांमध्ये सहभाग नोंदवत आर्थिक हितासोबत सामाजिक हित जपणारी बँक अशी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

या यशामागे ठेवीदार, सभासद, ग्राहक, हितचिंतक आणि कर्जदार यांचे सहकार्य महत्त्वपूर्ण ठरल्याचे चेअरमन श्रीधर भवर यांनी नमूद केले. प्रत्येक घटकाने बँकेला स्वतःची संस्था मानून दिलेल्या विश्वासामुळेच बँक अधिक सक्षम बनली असल्याचे त्यांनी सांगितले.

भविष्यातही बँक अधिक आधुनिक सेवा, नव्या संधी आणि विश्वासार्ह आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून प्रगतीचा वेग कायम ठेवणार असल्याचा विश्वास बँक प्रशासनाने व्यक्त केला आहे.

## उमरग्यात महादेव यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचा फड रंगला



उमरगा(प्रतिनिधी)-ग्रामदैवत महादेव मंदिराच्या यात्रेनिमित्त मंगळवारी (३१) सायंकाळी जंगी कुस्त्यांचा फड रंगला. या फडात कर्नाटकासह लातूर, सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यातील मल्लांनी विविध डावपेच आखत कुस्त्यांचा आखाडा लक्षवेधी केला. यामध्ये शेवट कुस्तीत बेळंबगीच्या सिध्दु पुजारी याने रामलिंग मुदगडच्या राम माळीचा दोन गुणांने पराभव केला.

ग्रामदैवत श्री महादेव मंदिराच्या यात्रेनिमित्त आयोजित कुस्तीच्या आखाड्यात लहान व मोठ्या गटातील मल्लांनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन करत कुस्त्या गाजवल्या. दरवर्षीप्रमाणे यंदाही कुस्त्यांना चांगली रंगत आली होती. कुन्हाळीच्या सतीश नरवटे यांनी रामलिंग मुदगडच्या महेश पाटील यांना अवघ्या दीड मिनिटात चितपट केले. भुसणीच्या तुकाराम सोनटक्के व कुन्हाळीच्या पंकज मुळजे यांची कुस्ती लक्षवेधी ठरली; मात्र वेळेअभावी ती अनिर्णित ठेवण्यात आली.

बाल कुस्तीपटू गणेश माळी, उमरग्याचा तनिष वजमन, ज्ञानेश्वर मोरे (होर्टी), बाबाजी औटी, माडजचा शेखर मारेकर यांच्यासह कुन्हाळी, गुगळगाव, भुसणी परिसरातील मल्लांनी फड गाजवला. कुस्तीच्या फडात एकूण दीडशे कुस्त्यांसाठी एकूण एक लाख दहा हजार रुपयांची बक्षिसे विजेत्या मल्लांना देण्यात आली.

यावेळी आमदार प्रविण स्वामी, पोलिस निरीक्षक प्रल्हाद सूर्यवंशी, महादेव पंच कमिटीचे सखाराम भातागळे, बाबूराव सुरवसे, राम पौळ, राजीव दामशेट्टी, भरत भोसले, चंद्रकांत मजगे, गोविंद घोटाळे, बळीराम कोराळे, नगरसेवक राहुल शिंदे, अशोक इंगळे, बाबूराव जाधव, शिवा मुरमे, अजय बेडगे, नितीन सुरवसे, दत्तात्रय शिंदे, रतन पाटील, किशोर शिंदे, राम माळी, अमर शिंदे, सुरज पाटील, गिरीश पाटील, नरेंद्र इंगळे, तानाजी शिंदे, आदी उपस्थित होते.

ज्येष्ठ कुस्तीपटू शिवाजीराव वराडे, सुंदर जवळगे, एम. जी. जाधव, बळीराम बिराजदार, अरुण काळे, राम कटारे, अमोल मिरकले, अभिषेक औरादे, बाळासाहेब शिंदे यांनी पंच म्हणून काम पाहिले, तर गोविंद घारगे यांनी उत्कृष्ट समालोचन केले.

सिद्धूला शेवटच्या कुस्तीचा बहुमान कै. अशोकराव पाटील यांच्या स्मरणार्थ रतन अशोकराव पाटील यांच्या वतीने शेवटच्या कुस्तीचा अकरा हजार रुपयांचा बहुमान देण्यात आला. हा मान बेळंबगी (ता. आळंद, कर्नाटक) येथील सिद्धू पुजारी यांना मिळाला. त्यांनी रामलिंग मुदगड (ता. निलंगा) येथील राम (भैय्या) माळी यांचा दोन गुणांनी पराभव केला.

सोंगाड्यांचे देखावे ठरले आकर्षण : शहरातील हेमाडपंती शैलीतील ग्रामदैवत श्री महादेव मंदिराला १२५ वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. या मंदिराच्या देवस्थान यात्रा महोत्सवाला रविवार (२९) पासून प्रारंभ झाला असून, तीन दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात्रेनिमित्त रविवारी (२९) रात्री हभप दयानंद महाराज मळगीकर यांचे कीर्तन झाले. सोमवारी (३०) दुपारी २ ते ५ या वेळेत शरदचंद्र महाराज बिराजदार यांचे काल्याचे कीर्तन झाले. सायंकाळी ६ ते रात्री ११ वाजेपर्यंत श्रींच्या काठी सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत सोंगाड्यांचे देखावे आकर्षण ठरले.

## ६७ कारवाया करुन ५४,७५० 'तडजोड शुल्क' वसुल

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०२ एप्रिल रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ६७ कारवाया करुन ५४,७५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

## येरमाळ्यात देवीच्या दर्शनासाठी भक्तांचा महापूर



येरमाळा,(प्रतिनिधी)- श्री येडेश्वरी देवी यांच्या चैत्र पौर्णिमा यात्रेला गुरुवारपासून (दि.२) उत्साहात प्रारंभ झाला. देवीच्या दर्शनासाठी लाखो भाविक येरमाळा नगरीत दाखल झाले आहेत. आई राजा उदो उदो...! या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला असून संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले आहे. शुक्रवारी (दि. ३) सकाळी १० वाजता होणाऱ्या चुना वेचण्याच्या मुख्य विधीमुळे भाविकांची गर्दी आणखी वाढण्याची शक्यता आहे.वृत्तपत्र सदस्यता

चैत्र पौर्णिमेनिमित्त देवीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवण्यात आला. दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली असून मिळेल त्या वाहनाने भाविक येत आहेत. शिव-रात, रस्त्याकडेला व झाडाखाली भाविकांनी राहुट्या उभारून मुक्कामाची तयारी केली आहे. रब्बी हंगामातील नवीन धान्याचा नैवेद्य देण्याची परंपरा पाळली जात असून संबळ, झांज, ढोलकीच्या तालावर आराधी गीतांनी वातावरण भक्तिमय झाले आहे.

## भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर कडक कारवाईची मागणी



धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- नाशिक जिल्ह्यातील भोंदू बाबा अशोक खरात याने महिलांची फसवणूक करून त्यांचे लैंगिक शोषण केल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून अशा नराधमावर तात्काळ व कडक कारवाई करण्यात यावी, अशी मागणी विविध सामाजिक संस्था व कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

या संदर्भात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री मा. ना. देवेंद्रजी फडणवीस यांना नळदुर्ग पोलिस ठाण्याच्या प्रभारी आयपीएस मेघना आय. एन. यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात म्हटले आहे की, अशोक खरात या भोंदूबाबाने अंधश्रद्धा आणि धार्मिक भावनांचा गैरफायदा घेत महिलांना आपल्या जाळ्यात अडकवून त्यांचे मानसिक व लैंगिक शोषण केल्याची प्रकरणे समोर येत आहेत. अशा प्रकारामुळे समाजात भीतीचे व संतापाचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. त्यामुळे अशा भोंदूबाबांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर परिवर्तन सामाजिक संस्था नळदुर्गचे सचिव मारुती बनसोडे, ज्ञानकिरण सामाजिक संस्था अणदूरचे अध्यक्ष भैरवनाथ कानडे, पौर्णिमा महिला मंडळ अणदूरच्या अध्यक्षा बबई चव्हाण, दमयंती शिक्षण संस्था नळदुर्गच्या अध्यक्षा सौ. सुभद्राताई मुळे, अंबव्वा महिला मंडळ जळकोटच्या अध्यक्षा कस्तुराताई कारभारी, रेणुका महिला बचत गटाच्या कल्पना गायकवाड, तसेच सामाजिक कार्यकर्ते रेवणसिद्ध कारभारी आणि नागेश चव्हाण यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.सदर प्रकरणी प्रशासनाने ठोस पावले उचलण्याची अपेक्षा सामाजिक संस्था व नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## पार्किंगसाठी ७० रुपयांची आकारणी; भाविकांत नाराजी

तुळजापूर (प्रतिनिधी)- तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर परिसरात चारचाकी वाहनांसाठी स्वच्छता कराच्या नावाखाली ७० रुपये आकारले जात असल्याने भाविकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. ही आकारणी अन्यायकारक असून ती कमी करण्याची मागणी वाहनधारक व भाविकांकडून होत आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या तुळजाभवानी देवीच्या दर्शनासाठी राज्यासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, तेलंगणा आदी राज्यांतून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. शहरात प्रवेश करताच प्रत्येक चारचाकी वाहनावर नगरपरिषदेच्या वतीने ७० रुपयांची पावती आकारली जाते. ही रक्कम केवळ १० ते २० रुपये असावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यापूर्वी वसंतदादा पाटील यांनी मंदिर प्रवेशावरील कर रद्द केला होता. मात्र सध्याच्या परिस्थितीत पार्किंग व स्वच्छता कराच्या नावाखाली मोठी रक्कम आकारली जात असल्याची टीका होत आहे. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून पार्किंगसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असतानाही, नगरपरिषदेकडून संबंधित ठिकाणांचे ठेकेदारी पद्धतीने लिलाव केल्याने खासगी गुत्तेदारांकडून मनमानी पद्धतीने वसुली होत असल्याचा आरोप आहे.

हा प्रकार तत्काळ बंद करावा, अशी मागणी नगराध्यक्ष विनोद गंगणे यांच्याकडे करण्यात आली आहे.दरम्यान, पुजारी कुटुंबांकडून भाविकांची चांगली सोय केली जात असली तरी शहरात प्रवेश केल्यानंतर आकारण्यात येणारा हा कर जाचक ठरत असल्याची भावना व्यक्त होत आहे. विशेषतः ट्रॅव्हल्स व भाडेतत्त्वावरील वाहनधारकांना हा कर परवडणारा नसून, तो २० रुपयांपर्यंत कमी करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

याशिवाय, कर आकारणीच्या तुलनेत शहरात आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचीही तक्रार आहे. स्वच्छतेचा अभाव, सुलभ शौचालयांची कमतरता तसेच वाहनचालकांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था नसल्याने भाविकांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. तुळजापूर मंदिराचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी कार्यरत असतानाही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने भाविकांमध्ये नाराजी वाढत असून, संबंधित प्रशासनाने याकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी केली जात आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649